म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा-वा
दा. क्र. : १५०७

# शी आवड



BVBK-0401901
BVBK-0401901

ईस्ट अँड वेस्ट बुक हाऊस : बडोदें

चित्रकार: श्री. जोगळेकर, बडोदें.

सर्वाधिकार सुरक्षित

प्रथमावृत्ति : १९४३

मुद्रक:-रा. का. तटणीस, श्रीलक्ष्मी नारायण प्रेस, ठाकुरद्वार, मुंबई
प्रकाशक:-भानुकांत पागेदार, ईस्ट अँड वेस्ट बुक हाऊस, बडोदें

६१०ho ९८०९
~~९८५७~~

वसंत-माला : १

# माझी आवड

## ( नोलनला देश नाहीं व इतर गोष्टी )

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क. ९८०९ नों. दि ..............
वि. ......... क. ..............

कृ. स. केळकर
हेडमास्तर, म्युनिसिपल मिडल स्कूल
यवतमाळ

म. ग्रं. सं. ठाणें.
वा. भा. ९८
BVBK-0401901

ईस्ट अँड वेस्ट बुक हाऊस : बडोदें

किंमत १२ आणे

अनुक्रम :


१ नोलनला देश नाहीं ! ... ... १

२ कुबेरगढी व सुवर्णधारा ... ... १५

३ मोह ... ... ४१

# नोलनला देश नाहीं !

१

"धिक्कार असो या अमेरिका देशाला ! अमेरिका हें नांव फिरून माझ्या कानीं कधींही न पडो अशीच माझी मनीषा आहे."

समोर उभ्या असलेल्या कैद्याच्या तोंडचे हे उद्गार ऐकून कोर्ट मार्शलचा अध्यक्ष कर्नल मॉर्गन हा स्तंभितच झाला ! त्याच्या सहकारी न्यायाधीशांपैकीं कित्येकांनीं अमेरिकेला स्वतंत्र राष्ट्र या पदवीला पोहोंचविण्याकरितां प्रत्यक्ष रणक्षेत्रावर आपले जीव धोक्यांत घातले होते. त्या अमेरिकेसंबंधींचे असे द्रोहमय उद्गार काढणाऱ्या त्या कैद्याच्या मनांत या देशभक्तांच्या मनःस्थितीची कल्पना आली नसेल काय ? त्यानें निराशेमुळें उत्पन्न झालेल्या मनःक्षोभाच्या झटक्यांत वरील उद्गार काढून देशद्रोहाचा कळस केला.

फक्त पंधराच मिनिटांत सरन्यायाधीश कर्नल मॉर्गन व त्याचें सहकारी-मंडळ आपल्या खाजगी खोलींतून चर्चा संपवून परत आले. कर्नल मॉर्गनचा चेहरा पांढरा फटफटीत झालेला होता. कोणती भयंकर शिक्षा त्यानें योजली असेल ?

" बंदिवाना, ऐक ! हें न्यायासन तुला शिक्षा सुनावीत आहे, ती ऐक ! तुला यानंतर युनायटेड स्टेट्सचें – अमेरिकेचें – नांव आजन्म ऐकावयास मिळणार नाहीं. या न्यायमंडळामार्फत मीं ही शिक्षा तुला दिली आहे. या देशाच्या अध्यक्षाच्या संमतीनें ती कायम केली जाईल."

ही शिक्षा ऐकून बंदिवान नोलन फक्त हंसला. पण न्यायाधीशाचें गांभीर्य पाहून इतर सर्वजण मात्र अगदीं निश्चल व स्तब्ध राहिले. न्यायमंदिरांतील या विचित्र स्तब्धतेनें नोलनचाही भ्रम ओसरूं लागला.




हें न्यायासन तुला शिक्षा सुनावीत आहे……

" जा, या बंदिवानास आरमाराच्या मुख्याधिकाऱ्याकडे एकदम घेऊन जा. याच्या कानीं याच्या देशाचें नांव न पडेल अशी पूर्ण खबरदारी घेण्याबद्दल माझा निरोप त्यांना सांगा. लेखी हुकूम त्यांना संध्याकाळपर्यंत मिळेलच."

पोलिस अधिकाऱ्यांनीं ताबडतोब हुकमाची अंमलबजावणी केली.

मिसिसिपी नदीवरील एका किल्ल्यावर नोलन हा एक तरणाबांड अधिकारी होता. युनायटेड स्टेट्सबद्दल त्याच्या मनांत मातृभूमीची निकट प्रेमाची भावना उत्पन्न होण्याइतका पूर्वापार जिव्हाळ्याचा संबंध नसला, तरी सैन्यांत भरती झाल्यापासून त्याचा पिंड त्या देशाच्या पैशावर व भूमीवर पोसला गेला होता, आणि याच देशाला मातृभूमि समजून त्याच्याशीं सदैव कर्तव्यनिष्ठ राहण्याची त्यानें शपथ घेतलेली होती. पण त्याच त्याच्या देशाचें नांव पुन्हां कानींसुद्धां पडूं नये अशी इच्छा त्यानें न्यायासनासमोर प्रदर्शित केली !

## थोडा पूर्वेतिहास

२

एके दिवशीं नोलनच्या किल्ल्यावर एक व्यक्ती आली. नोलनची व या नवख्या मनुष्याची गांठ पडली, संभाषण झालें, हिंडणेंफिरणें झालें. सरदारी थाटाच्या या गृहस्थाच्या सुमधुर भाषणानें व चित्तवेधक बोलण्याचालण्यानें नोलन त्याचा पूर्ण चाहता बनला. या नवीन व्यक्तीचें नांव 'ॲरनबर'. अमेरिकेच्या उपाध्यक्षपदावरून ही स्वारी नुकतीच मोकळी झाली होती.

ॲरनबर आले व गेले. नोलनची त्यांच्याबद्दलची भक्ति मात्र वाढतच चालली. पुन्हां कांहीं दिवसांनीं ॲरनबरची स्वारी त्या किल्ल्यावर आली. ॲरनबरनें आतां एक मोठें सैन्य जमविलें असून, तो मेक्सिको प्रांत जिंकून स्वतः तेथील राजा होण्याच्या खटपटींत आहे, अशी लोकवार्ता नोलनच्या

कानांवर पूर्वीच आलेली होती. त्याच्या गोडगोड शापांना भुलून या वेळीं नोलन ॲरनबरच्या पूर्ण कह्यांत गेला, व त्याच्या हुकमाचा बंदा झाला.

ॲरनबरच्या या खटाटोपाची बातमी अमेरिकेच्या अध्यक्षापर्यंत पोहोंचली. त्यांनीं ताबडतोब ॲरनबर व त्याचे सर्व सहकारी यांना पकडून कोर्ट मार्शलसमोर खेंचलें. चौकशी सुरू झाली व ती कित्येक दिवस चालू राहिली. या कटांतील बडेबडे अधिकारी हळूहळू कोणत्या ना कोणत्या मार्गानें निर्दोषी म्हणून सोडून देण्यांत आले. पण नोलन मात्र 'दोषी' समजला जाऊन त्याच्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवण्यांत आला. अर्थात्च अशा परिस्थितींत या तापट तरुणाचें डोकें भणाणून गेलें. त्याला कोर्ट मार्शलच्या या न्यायाचा तिटकारा आला, त्याचें मन निराशेनें व्यापून गेलें. अशा मनःस्थितींत तो असतांना न्यायाधीशानें त्याला विचारलें,

" अमेरिकेचा–तुझ्या देशाचा–द्रोह तुझ्या वर्तनानें झालेला नाहीं, असें सिद्ध करण्याकरितां तुला कांहीं सांगावयाचें आहे काय ? "

मनःक्षोभानें उत्पन्न झालेल्या मतिविभ्रमाच्या झटक्यांत त्या तापट तरुणानें काय उत्तर दिलें, व त्याचा परिणाम काय झाला हें, मुलांनो, तुमच्या ध्यानांत आलेंलंच आहे.

## २

जलपर्यटनाला सुरुवात झाली. जहाज अमेरिकेच्या किनाऱ्यापासून हळूहळू दूर दूर जाऊं लागलें. अमेरिकेचा किनारा दिसेनासा होऊं लागला. देशाला कायमपणें अंतरलेल्या नोलनच्या मनांत काय विचार सुरू असतील ? त्याला त्यानें मागून घेतलेल्या शिक्षेचा पूर्ण अर्थ तरी कळला होता काय ?

नोलन हा या जहाजावर कैदी म्हणून आलेला; परंतु त्याचा कैदीपणा नांवापुरताच होता. कपडेलत्ते व खाणेंपिणें त्याच्या योग्यतेनुरूप होतें. त्याला जहाजावर हवें तेथें हिंडण्याफिरण्याची मोकळीक होती. त्याच्या

ताब्यांत एक केबिन व शिवाय एक सुसज्ज खोली देण्यांत आलेली होती. त्याचा अपमान होऊं नये, इतकेंच नव्हे तर शक्य तोंवर त्याला त्याच्या कैदीपणाची आठवण सुद्धां होऊं नये अशी सर्वांच्याकडून काळजी घेतली जात असे. पण कांहीं झालें तरी त्याच्या देशाचें नांव त्याच्या कानीं पडूं नये याबद्दल मात्र कडेकोट बंदोबस्त राखला जाई.

प्रथम प्रथम या पर्यटनाची नोलनला मोठी मौज वाटली. मोठाल्या अधिकाऱ्यांशीं बोलणें चालणें, त्यांच्याबरोबर मधूनमधून जेवणखाण, गप्पागोष्टी इत्यादिकांच्या योगानें त्याचा वेळ आनंदांत जाई. पण या मंडळींच्या संभाषणांत तो असतांना मनमोकळेपणा संभवनीय नव्हता नोलनच्या लक्षांत ही गोष्ट यावयास उशीर लागला नाहीं. त्याला वाचावयास वर्तमानपत्रें देत; पण तीं कोणा तरी जबाबदार अधिकाऱ्यानें प्रथम वाचून अमेरिकेचा त्यांत नामनिर्देशही नाहीं अशी खात्री पटल्यावरच त्याला मिळत. अमेरिकेचा अप्रत्यक्ष ओझरता संबंधही जाहिरातींत अगर एखाद्या लेखांत आलेला असला तर तेवढा भाग कातरून तें सछिद्र वर्तमानपत्र त्याच्या हातीं पडत असे. पुस्तकांचीही तीच गोष्ट. नोलन खरा शिपाई गडी होता, व तो आळशी तर मुळींच नव्हता. या शिक्षेच्या अनिश्चित काळाचा तो अपव्यय केव्हांही करीत नसे. मिळेल त्या वाङ्मयाच्या वाचनांत तो रोज पांच तास घालवी. वाचलेल्या भागावर दोन तासपर्यंत टिपणें काढी व यानंतर करमणुकीखातर निरनिराळ्या समुद्रांतील सांपडणाऱ्या जलचर प्राण्यांचें शास्त्रीय निरीक्षण व संशोधन करीत असे. दररोजचा व्यायाम त्यानें कधींही चुकूं दिला नाहीं. या त्याच्या निरलस व नियमित कार्यक्रमामुळें त्याला आजार असा कधींच माहीत नव्हता. अशा रीतीनें नोलन आपली स्वयंनिर्णित शिक्षा भोगीत होता.

पर्यटन संपवून जहाज अमेरिकेच्या जवळ जवळ येऊं लागलें. किनाऱ्यालगतच्या एका बेटाशेजारीं जहाजाचा मुक्काम झाला. जहाज कां थांबलें हें कोणासच समजेना. एक आठवडाभर जहाजाचा तेथें मुक्काम झाला.

खलाशी आपापल्या घरीं जावयास अत्यंत उत्सुक झालेले होते. पण किनाऱ्याकडे जहाज बंदरांत जाण्याचा हुकूम होईना. एका आठवड्यानें दुसरें एक पर्यटनास निघालेलें जहाज या नांगरून पडलेल्या जहाजाजवळ येऊन उभें राहिलें. नोलनसंबंधींचे कागदपत्र या जहाजाच्या कप्ताना-कडे रवाना झाले व नंतर आपलें बाडबिस्तार आटोपून या दुसऱ्या जहाजावर जाण्यास नोलनला सांगण्यांत आलें. आपणास आतां आपल्या देशांत परत जावयास मिळेल या त्याच्या अंधुक आशेचा लय झाला! बिचारा नोलन! देश तर काय, पण देशांतील तुरुंगही त्याच्या नशिबीं नव्हता! ही गोष्ट त्याच्या ध्यानांत आली. अत्यंत जड अंतःकरणानें नोलन दुसऱ्या जहाजावर चढला. दोन्ही जहाजें आपापल्या मार्गानें चालू झालीं. अशा रीतीनें संबंध जन्मांत एका जहाजावरून दुसऱ्या जहाजावर अशी वीस वेळां त्याची बदली झाली.

अमेरिकन जहाजांची एका इंग्लिश जहाजाशीं ' केप् ऑफ् गुड् होप् ' जवळ गांठ पडली. एका अधिकाऱ्यानें इंग्लिश जहाजावर जाऊन कांहीं पुस्तकें आणलीं. त्यांत स्कॉटचें ' ले ऑफ् धि लास्ट मिन्स्ट्रेल ' हें पुस्तक होतें. एके दिवशीं आळीपाळीनें वाचन सुरू होतें. नोलन तेथें आला. वाचनाची त्याची पाळी आली. तो उत्तम वाचणारा होता. स्कॉटच्या काव्यांतील पांचवा सर्ग वाचावयास त्यानें सुरुवात केली—

" Breathes there a man with soul so dead,
Who never to himself hath said—
' This is my own, my native land,'

नोलनच्या आवाजांत बिघाड झाला. तो वारंवार अडखळूं लागला! त्याचा चेहरा क्षणांत पांढरा फिक्कट, तर क्षणांत तांबडा लाल होऊं लागला. त्यानें एकदम चारसहा पानें उलटून टाकलीं तर बरें असें सर्वांच्या मनांत आलें. पण त्याला हें सुचवावें कसें! नोलनलाही प्रसंगावधान राहिलें नाहीं. तो तशाच गोंधळलेल्या स्थितींत पुढें वाचूं लागला—

'For him no minstrel raptures swell,
' High though his titles, proud his name,
Boundless his wealth as wish can claim,
Despite those titles, power, and pelf,
The wretch, concentred all in self—"

येथपर्यंत त्यानें वाचन कसें तरी रेटलें; पण येथें त्याचा आवाज बंद झाला. पुढें वाचणें अशक्य होऊन तो एकदम उभा राहिला. त्यानें पुस्तक समुद्रांत भिरकावून दिलें आणि तो आपल्या खोलींत चालता झाला. या प्रसंगानंतर दोन महिनेपर्यंत त्यानें बाहेर तोंड काढलें नाहीं. त्याच्या हृदयाला झालेल्या जखमेचें दुःख त्याच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झालेलें होतें.

४

१८१२ सालीं इंग्लंड व अमेरिका या दोन देशांमध्यें युद्ध सुरू झालें. या युद्धांत एका ब्रिटिश जहाजाची नोलनच्या जहाजाशीं गांठ पडली. ब्रिटिश जहाजावरील तोफेचा एक गोळा धाडकन् आला. अमेरिकन तोफेवरील अधिकारी व कांहीं खलाशी प्राणाला मुकले. अमेरिकन जहाजावरील तोफ बंद पडली. प्रसंग मोठा आणीबाणीचा आला. नोलननें अस्तन्या वर सारल्या. तोफेवरील शिल्लक खलाशी जमविले व स्वतः तोफ डागण्यास सुरुवात केली. या धूमधडाक्यामुळें थोड्याच वेळांत शत्रूच्या जहाजानें पळ काढला. नोलनचें या वेळचें प्रसंगावधान व शौर्य जहाजाच्या कप्तानाच्या नजरेला पडलें. त्यानें नोलनचे मनःपूर्वक सादर आभार मानिले.

या चकमकीची हकीकत लिहितांना नोलनचा पराक्रम त्यानें मुद्दाम नमूद केला व त्याचा अपराध क्षमा करावा असें एक खास पत्र युद्धमंत्र्याला लिहिलें. पण व्यर्थ ! त्या पत्राचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. बहुतेक सर्व समुद्र नोलनच्या पर्यटनांत कित्येकदां येऊन गेले; पण त्याचा पाय

कोणत्याही किनाऱ्याला केव्हांही लागला नाहीं. अत्यंत व्यथित अंतःकरणानें पण मुकाट्यानें व धैर्यानें बिचारा नोलन आपली शिक्षा भोगीत होता. त्याच्यापासून कोणालाही काडीइतकासुद्धां त्रास पोहोंचत नसे. उलट तो कोणालाही मदत करण्यास सदैव तत्पर असे. त्यानें आपल्या मर्यादेचें उल्लंघन करण्याचा कधींही प्रयत्न केला नाहीं.

अटलांटिक महासागरांतून आफ्रिकेकडे नोलनच्या जहाजाची सफर सुरू होती. अमेरिकेकडे जाणारें एक छोटेंसें जहाज वाटेंत भेटलें. या जहाजावर आफ्रिकेंतून गुलाम म्हणून पकडून आणलेले कांहीं नीग्रो लोक होते. चोरून गुलामांचा व्यापार करणाऱ्या जहाजावर अर्थातच अमेरिकन जहाजानें हल्ला चढविला व तें कबजांत घेतलें. सर्व नीग्रो गुलामांना स्वातंत्र्य देण्यांत आलें व त्यांना पकडून आणणाऱ्या बदमाषांच्या नशिबीं मात्र जहाजावरील बंदिखाना आला. ही चाललेली भानगड नीग्रो गुलामांच्या ध्यानांत येईना. त्यांनीं आरडाओरड सुरू केली. नोलनला त्यांची भाषा येत होती; अर्थातच दुभाष्याचें काम कप्तानानें त्याच्याकडे सोंपविलें.

"तुम्ही आतां गुलाम नाहीं, तुम्हांस मोकळें करण्यांत आलें आहे. तुम्ही स्वतंत्र आहां." हे नोलनच्या तोंडचे उद्गार त्या बिचाऱ्या नीग्रो गुलामांना स्वर्गीय वाटले. त्यांचा आनंद गगनांत मावेना. ते नाचूंबागडूं लागले. त्यांनीं नोलनच्या व कप्तानाच्या पायांवर लोटांगणें घातलीं. आनंदप्रदर्शनाची ही भरती थोडी ओसरल्यावर कप्तानाच्या सांगण्यावरून नोलन त्यांना म्हणाला कीं, 'तुम्हाला लवकरच केप पाम या ठिकाणीं नेऊन सोडण्यांत येईल.' हें ऐकून त्यांचें समाधान न होतां त्यांनीं पुन्हां गडबड सुरू केली. नोलननें त्यांना जरा गप्प केलें. त्या नीग्रो लोकांचें म्हणणें जहाजाच्या कप्तानाला सांगतांना त्याच्या कपाळावर घर्मबिंदु आले—

"केप पामला आम्हांस नेऊं नका. आम्हांला आमच्या देशीं घेऊन चला. आम्हांला आमच्या घरीं न्या. आम्हांला आमच्या बायकांमुलांमध्यें नेऊन सोडा!"

" माझे वृद्ध मातापिता माझ्याकरितां प्राण सोडतील." एकजण म्हणाला.

दुसरा म्हणाला, "माझी बायको आजारी आहे. तिचें औषध आणण्याकरितां जात असतांनाच या काळपुरुषांनीं माझ्यावर झडप घालून मला पकडलें; माझ्यामागें तिची काय गत झाली असेल ?"

आणि तिसरा म्हणाला, "आज सहा महिने झाले मला घरची हकीकत मुळींच समजली नाहीं......"

नोलनला पुढें भाषान्तर करवेना. त्याला गुदमरल्यासारखें होऊं लागलें.

नोलनचा व्यथित चेहरा पाहून नीग्रो लोकांना आश्चर्य वाटलें. त्यांची गडबड थांबली. या दुर्दैवी प्राण्यांचें भयंकर दुःख पाहून कप्तानाच्या हृदयाला पीळ पडला. नोलन थोडा वेळ थांबून म्हणाला, "ठीक आहे. आम्ही तुम्हांस तुमच्या देशांत शक्य तितक्या लवकर पोहोंचवून देऊं."

नोलननें दुभाष्याचें काम केलें. पण यानंतर त्याला तेथें उभें राहवेना. तो तडक आपल्या खोलींत निघून गेला. त्याच दिवशीं संध्याकाळीं नोलनकडे एक तरुण खलाशी गेला असतांना तो त्याला म्हणाला,

"बाबा रे, तूं माझी स्थिति पहात आहेसच. कुटुंब नाहीं, घरदार नाहीं व देश नाहीं—ही स्थिती किती करुणास्पद असते हें माझ्याकडे पाहून तुझ्या मनावर पक्केपणीं बिंबूं दे. ज्या एखाद्या कृत्यामुळें अथवा ज्या एखाद्या उच्चारामुळें तुझी व तुझ्या कुटुंबाची फारकत होईल किंवा तुझें घरदार सुटेल, अथवा तूं आपल्या देशाला पारखा होशील, असा शब्द तुझ्या तोंडून निघण्यापूर्वीं अथवा त्या कृत्याला तूं प्रवृत्त होण्यापूर्वीं 'देवा मला मरण येऊं दे,' अशी देवाची करुणा भाकीत जा. आणि मुला, तो तुझा देश व...व"...नोलनचा आवाज आंतल्या आंत घुटमळूं लागला. "बाबा रे, तो तुझा देश व, हें पहा, तुझ्या देशाचें निशाण—जागृतींत तर

काय, पण स्वप्नांतसुद्धां त्यांची सेवा विसरूं नकोस. या सेवेंत तुला अनेक हालअपेष्टा तर काय पण प्रत्यक्ष नरकवास घडला तरी बेहेत्तर; पण देशाला विन्मुख होऊं नकोस. तुझें कांहींही होवो, तुला कोणी बरें म्हणो वा वाईट म्हणो, पण आपल्या देशाच्या निशाणाशिवाय इतर कोणत्याही निशाणाकडे ढुंकून सुद्धां पाहूं नकोस."

५

दिवसामागून दिवस जात होते; वर्षेंही उलटून चाललीं होतीं व नोलनही एका समुद्रावरून दुसऱ्या समुद्रावर याप्रमाणें भटकत होता. त्याची 'इच्छा' त्याच्या कल्पनेबाहेर परिपूर्ण होत होती. त्याच्या मनाला पश्चात्तापाचे असह्य चटके बसत होते. पण तो स्वतःच मागून घेतलेली शिक्षा मर्दाप्रमाणें भोगीत होता. त्याची वृत्ति नेहमीं शांत, गंभीर आणि अत्यंत सोशिकपणाची असल्यामुळें त्याच्यापासून कोणालाही त्रास होत नसे. नोलनवर म्हातारपणाची छाया तडाखून येऊं लागली. सरते शेवटीं तो आजारी पडला.

डॉक्टरनें येऊन नोलनची प्रकृति तपासली. नोलनच्या भोंवतीं त्याची मित्रमंडळी जमली. थोड्या वेळानें सर्वजण आपआपल्या उद्योगाला गेले. जहाजाचा मुख्य कप्तान डॉनफोर्थ एकटाच नोलनजवळ होता. नोलनच्या सांगण्यावरून डॉनफोर्थनें एक पडदा बाजूलासारला. पडद्यामागें वॉशिंग्टनचें चित्र होतें व त्या चित्राभोंवतीं अमेरिकेचें निशाण व्यवस्थित घडी करून बसविलें होतें. चित्राजवळच हातानें काढलेला अमेरिकेचा ओबडधोबड नकाशा असून त्यावर कांहीं प्रदेशांचीं नांवें कशीं तरी काढलेलीं होतीं.

नोलन आपल्या शय्येवर पडलेला होता. त्याच्या चेहऱ्यावर हास्य दिसत होतें, पण त्याच्या या हास्यामध्येंही त्याचें व्यथित अंतःकरणच स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेलें होतें.

म. ग्रं. सं. ठाणें.



पडद्यामागें वॉशिंग्टनचें चित्र, अमेरिकाचा नकाशा व निशाण होतें.

" मित्रा पहा, हा माझा प्यारा देश. मित्रा, मी आतां लवकरच मरणार. मला दुर्भाग्याला माझ्या देशाचें दर्शन अखेरीस सुद्धां होत नाहीं ना ! मरणापूर्वी एकदां तरी मला माझ्या देशाचें नांव व माझ्या देशाची हकीकत तुझ्या तोंडून ऐकूं दे. थांब, जरा थांब. तुला माहीत आहेच; पण मी तुला सांगतों ऐक. माझ्या देशावर–माझ्या अमेरिकेवर माझ्याइतकें प्रेम करणारा मनुष्य या जहाजावर तर काय, पण संबंध अमेरिकेंतसुद्धां सांपडणार नाहीं. या माझ्या राष्ट्रीय निशाणाच्या उन्नतीप्रीत्यर्थ माझ्याइतकी अंतःकरणपूर्वक प्रार्थना फारच थोडयांच्या तोंडून निघत असते. डॉनफोर्थ, मला मरण्यापूर्वी माझ्या देशाचा इतिहास सांग. मला त्याबद्दल सर्व कांहीं ऐकूं दे. त्याशिवाय मला सुखानें मरण येणार नाहीं."

" ठीक आहे. नोलन, मी तुला सर्व कांहीं सांगतों. ऐक, आपल्या देशाची संपूर्ण हकीकत स्वस्थ चित्तानें ऐक."

" देव तुझें बरें करो "—नोलन म्हणाला.

नोलनचा चेहरा टवटवीत झाला. त्याच्या मुखावर सुहास्य चमकूं लागलें. त्यानें आपल्या मित्राचा हात आपल्या हातांत घट्ट धरला व तो त्याच्याकडे प्रसन्न मुद्रेनें व आशापूर्ण दृष्टीनें पाहूं लागला.

डॉनफोर्थनें अमेरिकेचा इतिहास सांगण्यास सुरुवात केली. अमेरिकेची अर्धशतकाची हकीकत त्यानें त्या मरणोन्मुख मुमुक्षूला एका तासांत सांगितली. युनायटेड स्टेट्स्मध्यें प्रविष्ट झालेल्या नवीन नवीन संस्थानांचीं नांवें, अमेरिकेचा त्या वेळचा अध्यक्ष, वॉशिंग्टननें केलेलें लोककार्य व त्याची लोकप्रियता, आणि सर्व दृष्टीनें झालेली अमेरिकेची राजकीय प्रगति यांबद्दल डॉनफोर्थनें त्याला हकीकत सांगितली. नंतर निरनिराळे शोध, प्रवासाचीं नवीन साधनें, शिक्षणाची व वाङ्मयाची वाढ व इतर सर्व तऱ्हेनें अमेरिकेचा होणारा उत्कर्ष यांबद्दलही डॉनफोर्थनें नोलनला माहिती सांगितली. नोलननें मधूनमधून प्रश्न विचारले. त्यांचीं उत्तरें डॉनफोर्थनें दिलीं. गेल्या पन्नास वर्षांत नोलनला असा आनंद कधींही झाला नव्हता. त्यानें आपल्या देशाचा इतिहास हर्षभरित चित्तानें ऐकून घेतला. त्याच्या चेहऱ्यावर शांति विलसूं लागली.

" तें माझें पुस्तक इकडे दे पाहूं "—नोलन म्हणाला.

डॉनफोर्थनें नोलनजवळ त्यांचें पुस्तक दिलें.

" मित्रा, ही पहा, माझ्या देशाकरतां परमेश्वराची करीत असलेली ही प्रार्थना पहा. या पन्नास वर्षांत ही प्रार्थना करण्यास मी एकही दिवस चुकलों नाहीं. मित्रा, कोणत्या शब्दांत मी आतां विश्रांति घेतों तें मी मेल्यावर माझें बायबलचें पुस्तक जरूर उघडून पहा."

नोलन शांतपणें झोंपीं गेला. डॉनफोर्थ हळूच खोलीबाहेर पडला.

एक तासानें डॉक्टर नोलनच्या खोलींत गेला. नोलनचें प्राणोत्क्रमण झालें होतें. पण त्याच्या चेहऱ्यावरील हास्य मात्र मावळलें नव्हतें.

नोलनच्या बायबलमध्यें एक चिठ्ठी सांपडली.

" समुद्रांतच माझें दफन करा. समुद्र हेंच माझें घर होतें व म्हणूनच मला तो प्रियही वाटतो.

"माझी स्मृति म्हणून फोर्ट ॲडम्स अथवा ऑर्लिन्स येथें एखादा कोणी दगड रोवील काय ? त्यावर खालील मजकूर असावा—

> **फिलिफ नोलनच्या स्मृत्यर्थ**
>
> युनायटेड स्टेट्‌सच्या सैन्यांतील एक लेफ्टनंट
>
> कोणाही मनुष्याचें नसेल इतकें प्रेम तो आपल्या देशावर करीत असे; पण या प्रेमाचा मोबदला मिळण्याची लायकी मात्र त्याची सर्वांहून कमी होती.

म. ग्रं. सं. ठाणें.




एका मोठ्या बुडबुड्यावर तोच धोंगड्या म्हातारा ऐटींत बसला होता.

म. ग्रं. सं. ठाणें.

# कुबेरगढी व सुवर्णधारा *

## भाग १ ला

हिमालयांतील अगदीं एका बाजूचें हें ठिकाण कोणत्याही प्रसिद्ध यात्रेच्या मार्गावर नसल्यामुळें त्याची माहिती बाहेरच्या जगाला जवळजवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. बर्फाच्छादित शिखरांनीं वेष्टिलेल्या एका लहानशा सुंदर खोऱ्याला कुबेरगढी हें नांव आहे. कुबेरगढीच्या भोंवतालच्या पर्वतशिखरांवरून अनेक जलप्रवाह धो धो करीत खालील अनेक खोल दऱ्यांतून उडया घेत होते. त्यांच्यापैकीं एक धबधबा एका अत्युच्च शिखरावरून खालीं उडी घेत असे. सायंकाळच्या समयीं सूर्याचे सुवर्णवर्ण किरण या जलस्रोतावर पडत; आणि इतर सर्व गिरिशिखरें व दऱ्याखोऱ्या यांच्यावर अंधार पसरूं लागला तरी कांहीं वेळपावेतों हा धबधबा सूर्याच्या सुवर्णवर्ण किरणांनीं तप्त सोन्याच्या प्रवाहाप्रमाणें चकाकत असे; आणि म्हणूनच या धबधब्याला लोक सुवर्णधारा असें म्हणत.

कुबेरगढींतून दिसणाऱ्या या सहस्रावधी जलप्रवाहांपैकीं एकही प्रवाह प्रत्यक्ष कुबेरगढीला मात्र लाभला नव्हता. सभोंवारच्या दऱ्याखोऱ्यांतून उडया घेत घेत हे प्रवाह गंगा व यमुना नद्यांच्या भेटीला निघून जात. कुबेरगढीला त्याची विशेष भीति नव्हती. कुबेरगढीची नैसर्गिक रचना इतकी सुंदर होती कीं, सभोंवारच्या टेकडयांमुळें ढग अडले जाऊन नित्यशः येथें पाऊस पडत असे. सर्व भारतवर्ष उन्हाळ्याच्या भयंकर उष्णतेनें भाजून निघत असतांना सुद्धां कुबेरगढीवर मधून मधून पावसाच्या सरी येत व हवा अत्यंत आल्हाददायक असे. या लहानशा दरींतील फुलझाडें

---

* Ruskin 'च्या King of the Golden River च्या आधारें.

नेहमीं फुललेलीं असत. त्यांच्या भोंवतीं मधमाशांचा गुंजारव सुरू असे. पिकें भरभक्कम येत. सर्व तऱ्हेचीं फळें, विशेषत: येथील द्राक्षें व सफरचंद यांना तर कोठेंही तोड सांपडणें कठिण इतकीं मधुर असत; आणि म्हणूनच या एका बाजूच्या लहानशा दरीला कुबेरगढी असें सार्थ नांव मिळालें होतें.

फार प्राचीन काळीं देवव्रत नांवाच्या एका सुशील गृहस्थानें तपश्चर्या केली व तिचें फल म्हणून शंकराचा त्याला साक्षात्कार झाला. शंकराच्या प्रसादानें हें स्थान देवव्रताला वंशपरंपरा प्राप्त झालें. ईश्वरकृपेनें येथील सुबत्तेमध्यें कधींच खंड पडत नसे. हजारों वर्षें झालीं. देवव्रताच्या वंशजांकडे कुबेरगढीचें आधिपत्य चालू होतें. भारतवर्षांत अनेक राज्यक्रान्त्या झाल्या, पण छोटेखानी कुबेरगढी या क्रान्तिचक्रापासून अगदीं अलिप्त होती. कुबेरगढीचें पावित्र्य व स्वातंत्र्य हजारों वर्षें कायम होतें. – पण कालानें फरक कशांत पडणार नाहीं ? मध्यंतरीं एकदां देवव्रताच्या प्राचीन तपश्चर्येचें पुण्य संपुष्टांत आल्यासारखें दिसूं लागलें होतें. या छोटेखानी जहागिरीची मालकी त्या वेळीं तीन भावांच्याकडे आली होती. त्यांच्यांतील दोन्ही वडील भावांत चांगुलपणाचा व पूर्वपुण्याईचा लेशमात्रही शिल्लक राहिलेला दिसत नव्हता. सर्वांत धाकटा यशवंत हा अत्यंत सुशील व सद्वर्तनी असा बारा वर्षांचा छोकरा होता. याच्या रूपानें देवव्रताच्या प्राचीन कुटुंबाची पुण्याईच अवतरली होती, असें म्हटल्यास हरकत नाहीं. त्याचा चेहरा गोड, प्रेमळ व सुंदर होता. त्याच्या दृष्टींत व वर्तनांत मृदुपणा व दयाळुत्व होतें. अर्थातूच दोन्ही वडील बंधूंच्या दृष्टीनें तो अगदीं मूर्ख होता; व म्हणूनच त्यांच्या हातीं कारभार आल्याबरोबर घरांतील चिल्लर नोकरांची हकालपट्टी होऊन तीं सर्व कामें यशवंताकडे आलीं होतीं. स्वयंपाक करणें, भांडीं घांसणें, सारवणें इत्यादि कामें तो करी. बंधूंच्या भोजनाच्या अवशेषावरच त्याला आपली क्षुधा शमवावी लागे. प्राचीन पंतोजीच्या शिक्षणपद्धतींपैकीं ‘ छडी लागे छमूछम् ’चा उपयोगही त्याला शिकवितांना केला जाई.

असो. गोष्ट येथपर्यंत आली; पण यशवंताच्या वडील बंधूंचीं नांवें तर सांगावयाचीं राहिलींच. वडील भावाचें नांव झोटिंग व दुसऱ्याचें फटिंग. या टोपण नांवांशिवाय त्यांचीं मूळचीं नांवें कोणालाच माहीत नव्हतीं.

कुबेरगढींत झोटिंगपातशाही सुरू झाली. झोटिंग व फटिंग हे उत्तम शेतकरी यांत संशयच नाहीं. त्यांच्या शेतीला व बागेला यत्किंचितही नुकसान पोहोंचविणारे प्राणी त्यांच्याकडून निर्दयपणें मारले जात. या तडाक्यांतून बागडणारीं सुंदर हरणें व किलबिल करणारे पक्षी हे सुद्धां सुटत नसत. दया ही मनोभावना झोटिंगपातशाहींत कोठून दिसणार ? शेतीवर नोकर ठेवावयाचे; त्यांच्याकडून करार करून घ्यावयाचे; कसून काम करून घ्यावयाचें व नंतर कांहीं तरी खुसपट काढून त्यांना निर्वेतन हांकून द्यावयाचें हा तर त्यांचा नित्यक्रम असे. या पद्धतीनें वागून या चिक्कू भावांनीं खूप धनसंचय केला.

देवव्रताच्या कुबेरगढींतील दानधर्म पूर्ण लोपला होता. झोटिंग व फटिंग यांनीं कधीं उष्ट्या हातानें कावळा हांकल्याचें सुद्धां कोणाला आठवत नाहीं. या अलोट संपत्तीवर हे दोन नागोबा सारखे फुसफुस करीत वावरत होते व त्यांच्या तावडींत या अलोट संपत्तीबरोबर यशवंतही सांपडला होता. बिचारा यशवंत ! त्याचें सौजन्य या विषारी फूत्कारांनीं करपून गेलें नव्हतें; पण तें सौजन्य दिसण्याला वाव मात्र नव्हता.

× × ×

सर्व प्रान्तभर पावसानें धुमाकूळ मांडला होता. शेतकऱ्यांचें पीक अगदीं हातातोंडाशीं आलेलें ! सर्व पीक वाहून गेलें. लोक अन्नाला मोताद झाले. पण कुबेरगढीला त्याचें काय ? येथें पाऊस नित्याप्रमाणें बेताचा झाला. पिकें सुंदर आलीं. इतर ठिकाणीं हाहाःकार उडाला असतांना कुबेरगढी देवाच्या छत्राखालीं होती. तिचा धनधान्यसंचय वाढत होता.

हिंवाळा आला. हिमालयांतील हिंवाळा तो–कोण ती कडक थंडी ! एके दिवशीं संध्याकाळीं दोन्ही वडील बंधू घरांतून बाहेर पडले. “ येश्या,

लेका याद राखून ठेव ! जर कोणाला घरांत येऊं दिलेंस आणि जर·का कोणाला कांहीं देण्याघेण्याच्या भानगडींत पडलास तर, तुझीं शंभर वर्षें भरलींच म्हणून समज." झोटिंग मोठयानें गरजला. फटिंगानें घोगऱ्या आवाजांत पहिल्या वक्त्याची साथ केली. यशवंताला यांत नवीन कांहींच नव्हतें. दोन्ही बंधू बाहेर पडतांना हा मंत्र उच्चारल्याशिवाय कधींही बाहेर पडत नसत.

शेगडीजवळ बसून यशवंत पुऱ्या तळीत होता. एका ताटांत मोजून ठेवलेल्या लाडवांची रास होती. आज मेजवानी उडविण्याचा दोन्हीही बंधूंचा बेत होता. कांहीं पुऱ्या व उरल्यास लाडू तुलाहि मिळतील असें उदार देणगीचें वचन यशवंताला आज मिळालें होतें. धुराड्याखालच्या मोठ्या चुल्यांत विस्तव पेटला होता. स्वयंपाकघरांत चांगलीच ऊब होती. यशवंत खिन्न मनानें आपलें काम करीत होता. त्याच्या मनांत विचार आला, 'गरीबगुरिबांवर दया करण्याचें सामर्थ्य असतां दादांच्या व अण्णांच्या मनांत दया कां बरें येत नसेल? देवा, त्यांच्या मनांत...'

धाड् ! धाड् ! ठक् ! ठक् ! ठक्.....

—'कोण बरें दार ठोठावत असेल ! वाऱ्याचाच असेल हा आवाज. बाहेर वारा घोंघावत होता व पाऊसही पडूं लागला होता. छेः ! पण वारा नव्हेच; कारण पुन्हां तोच आवाज. झोटिंगच्या घराचें दार ठोठावण्याचें धाडस करणारा कोण बरें असेल !'

यशवंतानें खिडकी किलकिली करून बाहेर पाहिलें. बाहेर अंधार होता; पण खिडकींतून बाहेर पडणाऱ्या तांबड्या उजेडांत त्याला एक माणूस दिसला.

हातांतील काठीवर भार देऊन तो माणूस उभा होता. म्हातारपणानें त्याच्या दाढीमिशा पांढऱ्या शुभ्र झाल्या होत्या. अंगावर एक फाटकी घोंगडी होती व तिच्या भोकांतून पावसाचें सर्व पाणी त्याच्या अंगावर उतरत होतें. अंधारांत चेहरा कांहीं नीटसा दिसला नाहीं; पण कोणी तरी

पावसानें ओलाचिंब भिजलेला म्हातारा दाराशीं उभा आहे एवढें यशवंताच्या ध्यानांत आलें. म्हाताऱ्याची दृष्टि त्याच्याकडे गेली.

" अरे, दार उघड कीं ! पहात काय उभा आहेस ? पावसानें व थंडीनें गारठण्याची वेळ आली आहे मला. तूं दार न उघडतां गंमत पाहतो आहेस ! "

" म्हातारेबाबा, दार उघडण्याची गोष्टच बोलूं नका. मीं तुम्हाला दार उघडलें कीं दादा व अण्णा मला मरेमरेतों मार देतील. तुम्हांला कांहीं पाहिजे असल्यास सांगा."

" अरे बाळ, येऊं दे मला आंत. मी थंडीनें काकडतों आहे अगदीं. मी त्या शेगडीजवळ थोडा वेळ बसेन. पहा कीं किती सुरेख पेटली आहे ती शेगडी ! " म्हाताऱ्यानें तेथूनच आपले कांपरे हात शेगडीकडे दाखवून शेकण्याचा आविर्भाव केला.

यशवंताची दृष्टि मागें वळली. ती धगधगणारी शेगडी त्याला दिसली. खिडकींतून डोकें बाहेर काढल्यामुळें बाहेरील थंडीचीही त्याला कल्पना चांगली आली होती. शेगडीचीही सर्व ऊब फुकट जात होती; आणि बाहेर तो गरीब म्हातारा कुडकुडत दीनवाणेपणानें उभा होता.

काय होईल तें होवो असा निश्चय करून यशवंतानें दार उघडण्याचें ठरविलें. इतक्यांत कांहीं दादा-अण्णा येणार नाहींत, तेव्हां थोडया वेळानें याला जाण्यास सांगावें म्हणजे झालें—असा विचार करून यशवंतानें दार तर उघडलें.

अरे बाप रे केवढा हा वाऱ्याचा झोत ! दार उघडतांच सर्व इमारत हादरल्याचा यशवंताला भास झाला. त्यानें म्हाताऱ्यास आंत घेऊन खाड्कन् दार बंद केलें.

" शाबास ! देव तुझें बरें करो." असें म्हणत म्हातारा शेगडीजवळ कट्टयावर बसला. " तूं तुझ्या भावांची नको फिकीर करूं. मी त्यांची घालीन समजूत."

" छे, छे, म्हातारेबोवा ! या भानगडींत मात्र तुम्ही पडूं नका. ते येण्यापूर्वीच तुम्ही बाहेर पडा; नाहीं तर माझीं शंभर वर्षे भरलींच समजा." हें बोलतांना यशवंता अगदीं काकुळतीला आला होता.

म्हाताऱ्यानें मान डोलविली. तो शेकूं लागला. यशवंता पुऱ्या तळूं लागला. त्याचें काम संपतच आलें होतें.

म्हाताऱ्याच्या घोंगडींत किती पाणी होतें कोण जाणें ! तिच्यांतून टिपकणाऱ्या पाण्याचे ओघळ स्वयंपाकघरभर वाहूं लागले. तें पाहून यशवंता म्हणतो, " बाबाजी, तुमची घोंगडी द्या जरा इकडे; मी ती खुंटीवर तरी वाळत घालतों."

" कांहीं नको बाळ, ठीक आहे. वाळेल ती माझ्या अंगावरच." असें म्हाताऱ्यानें म्हटलें, व तो त्या ताज्या पुऱ्यांकडे पाहूं लागला. फळीवरील लाडवांचें व बटाट्याच्या भाजीचें ताटही त्याला दिसलें. त्यानें इकडे तिकडे ओशाळल्यासारखें पाहिलें व शेवटीं म्हणाला, " मुला, मला फारच भूक लागली आहे बघ. देवाच्या दयेनें किती तरी सुग्रास अन्न इथें तयार आहे. मला देतोस थोडेंसें त्यांतलें ? "

" छेः छेः ! तेवढें मात्र मागूं नका म्हातारे बाबा. मी स्वतंत्र नाहीं. शिवाय लाडू पुऱ्या इत्यादि सर्व जिन्नस मोजके आहेत. त्यांतील थोडेही कमी झाले तरी तें दादांच्या खात्रीनें ध्यानांत येईल; आणि मग मला कांहींही खावयास तर मिळणार नाहींच, पण रट्टे मात्र मिळतील यथास्थित."

मुलाचें हें भाषण ऐकून म्हाताऱ्याचा चेहरा फारच खिन्न दिसूं लागला. भुकेनें व्याकूळ झाल्यानें म्हातारा काकुळतीस येऊन पुन्हां त्याला म्हणाला,

" पहा बुवा तुला दया आली तर ! गेल्या दोन दिवसांत माझ्या पोटांत अन्नाचा एक कणही गेलेला नाहीं; आणि येथून तूं मला उपाशीं विन्मुख पाठविणार ! "

यशवंतानें थोडासा विचार केला व म्हणाला, " म्हातारे बाबा, असे कष्टी होऊं नका; मी माझा वांटा तुम्हांस देतों. मग काय होईल तें होवो."

असें म्हणून एका थाळ्यांत चार पुऱ्या व दोन लाडू त्यानें ठेविले व भाजीच्या नीट रचलेल्या ढीगांतून बाजूनें भाजी काढण्याकरितां म्हणून एक मोठा चमचा त्यानें भाजींत घातला. तोंच दारावर धाड् धाड् असा ठोठावण्याचा आवाज आला. भाजींतून चमचा काढून तिचा ढीग पुन्हां नीट लावून ठेवण्याची यशवंतानें खूप धडपड केली; तोंच पुन्हां दार धाड् धाड् वाजूं लागलें. यशवंता दार उघडण्याकरितां धांवतच गेला. म्हातारेबोवा आपली घोंगडी सावरीत खाडकन् उभे राहिले.

दार धाडकन् उघडलें व यशवंताच्या डोक्यावर ओल्या छत्रीचा दादांच्या हातचा रट्टा बसला; व ते गरजले, "का रे गद्धया–आम्हांला पावसांत बाहेर किती वेळ उभें ठेवलेंस ?"

अण्णांच्याही घोगऱ्या आवाजानें तीच गर्जना केली व यशवंताच्या पाठींत त्यांच्या हातचा एक गुद्दा बसला.

इतक्या वेळांत म्हातारेबोवा आपलें मुंडासें सांवरीत उभे राहिले व घोंगडी सांवरीत म्हणाले, "रामराम दादा, रामराम."

"आणि हा रे कोण आगंतुक ? हा येथें कसा शिरला ? बोल, येश्या, गद्धया, तूं याला आंत कां घेतलेंस ?" झोटिंग म्हणाला.

"दादा, तो इतका ओलाचिंब झाला होता, अन्..."–झोटिंगच्या हातीं एक लाटणें लागलें; तें उगारून त्यानें बिचाऱ्या यशवंताच्या डोक्यांत मारलें. पण काय चमत्कार ! म्हातारेबोवांची घोंगडी वाऱ्यामुळें फड्कन् मध्यें आली व तें लाटणें एका खोलीच्या कोपऱ्यांत एखाद्या गवताच्या काडीप्रमाणें उडून जाऊन पडलें.

झोंटिंग म्हाताऱ्याकडे वळून म्हणतो, "कोण रे तूं ? तुझें येथें काय काम आहे ?" फटिंग नुसता गुरगुरला.

"कांहीं नाहीं, दादा, बाहेर मी अगदीं ओला झालों होतों. तुमच्या घरांतली शेगडी दिसली मला बाहेरून आणि म्हणून थोडा वेळ आश्र-

याला आलों तुमच्या." असें म्हणून म्हाताऱ्यानें अगदीं लवून पुन्हा रामराम केला.

"ठीक आहे तर; पुरे झाला आतां आमचा आश्रय. निकलो बाहेर एकदम. काय ओलें केलें आहे बेटयानें स्वयंपाकघर! ऐकलंस ना काय म्हणतों तें मी ?" झोटिंग ओरडला.

"दादा, माझ्या पिकलेल्या केसांची दया येऊं दे रे! कोण थंडीचा कडाका आहे बाहेर आणि मला--"

"अरे निघ येथून. कांहीं मरत नाहींस थंडीनें बुड्ढया," फटिंग आणखी मोठयानें ओरडला.

"बरें आहे, जातों मी बाहेर; पण--पण--जाण्यापूर्वी थोडी भाकर द्या कीं गरिबाला. फार भुकेलेला आहें मी." तोंड अगदीं केविलवाणें करीत म्हातारा उद्गारला.

"हो हो तर, अन्नछत्रच आहे कीं नाहीं इथं!" झोटिंग म्हणाला.

"तें मुंडासें वीक ना! येतील त्याचे चार सहा पैसे फुटाण्यांपुरते." फटिंगानें टोमणा दिला. "निघ येथून, काय लोचट आहे बुड्ढा!"

"मालक, गरिबावर दया——"

झोटिंग पाय आपटीत ओरडला, "एकदम चालता हो बाहेर." त्याला बाहेर घालविण्याकरितां त्यानें त्याच्या घोंगडीचें टोक धरलें मात्र, तों काय चमत्कार! झोटिंग वाऱ्यानें उडणाऱ्या एखाद्या पिसाप्रमाणें उडून कोपऱ्यांत लाटणें पडलें होतें त्यावर जाऊन पडला. हें पाहून फटिंगाचा संताप अनावर झाला व त्यानें म्हाताऱ्यावर हल्ला केला! त्याचीही स्थिति ताबडतोब वडील बंधूप्रमाणें होऊन एका कोपऱ्यांत लाटणें, झोटिंग व फटिंग जाऊन पडले. म्हातारा त्यांच्याकडे वळून म्हणाला, "रामराम, दादा, रामराम! आज रात्रीं बरोबर बारा वाजतां मी आपल्या भेटीस येईन. माझें जें आदरातिथ्य तुम्हीं केलेंत, त्यानंतर खरें पाहतां मी तुमच्याकडे येऊंच नये; व आजची रात्र उलटली कीं माझें दर्शन तुम्हास पुन्हां होणारही नाहीं."

झोटिंग भीतभीतच कोपऱ्यांतून उठला व म्हणाला, "अरे, चल जा म्हाता——"

पण त्याचें वाक्य पुरें होण्यापूर्वींच म्हाताऱ्यानें बाहेर जाऊन दार खाड्कन् लावून टाकलें. त्याच वेळीं एक चित्रविचित्र ढग हळूहळू कुबेर-गढीच्या दरींतून बाहेर पडला आणि शेवटीं पावसाची एक सरही पण आली.

" येश्या, चांगलाच पाव्हणा घेतला होतास घरांत ! बरं, पानें मांड पाहूं आमचीं ! पण हें रे काय ? हे लाडू व पुऱ्या येथें ताटलींत वेगळे कां ? आणि भाजींत हा चमचा कोणी खुपसला ? " झोटिंगनें यशवंताची हजेरी घेतली.

" दादा, तुम्ही मला हें फराळाचें देणार होतां ना ? "

" अस्सं ! म्हणून आमच्या आधींच फराळावर ताव मारणार होतास होय ? " फटिंग बोलला.

" निघ गाढवा येथून. तुला कांहीं एक मिळणार नाहीं."

यशवंताला फार वाईट वाटलें, पण तो मुकाट्यानें तेथून निघून गेला. त्याला फार भूक लागली होती, पण उपाय काय ?

दोन्ही बंधूंनीं फराळावर ताव मारला. उरलेलें फडताळांत ठेवून त्याला कुलूप ठोकलें व नंतर बाटलाबाईचा प्रसाद यथेच्छ झोकून दारें बंद करून ते तसेंच त्या खोलींत पसरले.

× × ×

काय ती भयंकर रात्र ! सोसाट्याचा वारा सूं सूं करून वाहत होता व पाऊसही खूप जोराचा कोसळत होता. बाराचे ठोके पडले; तोंच घराचें मजबूत दार काड्काड् वाजलें व धाड्दिशीं फळ्या उघडल्या. या कडकडाटानें सर्व घर हादरलें.

" अरे बापरे ! काय हें ! कोण आहे रे गद्धा दाराशीं ? " असें ओरडतच झोटिंग उठला. फटिंगही त्याच्याच बरोबर गुरगुरत होता. दोघेही ताड्कन् उभे राहिले.

अंधार गुडुप पडला होता. खोलीचें छप्पर उडून गेलें होतें. एक वीज चमकली. खोलींत पाणीच पाणी झालें होतें; आणि त्यावर अनेक बुडबुडे

इतस्ततः तरंगत होते. पुन्हां अंधार गुडुप झाला. एकच क्षण वीज चमकली. काय चमत्कार! एका मोठ्या बुडबुड्यावर तोच धोंगड्या म्हातारा ऐटींत बसला होता. बुडबुडा गरगर फिरत होता—" खोली जरा ओलसर झाली असेल ना रावसाहेब! असें करा तुम्ही, जरा यशवंताच्या खोलींत जा आश्रयाला. ती बरी सांपडेल तुम्हांला." सोसाट्याच्या वाऱ्यांतून, सळसळणाऱ्या पावसांतून आणि गडद अंधारांतून पुन्हां म्हाताऱ्याचा आवाज आला-" रामराम रावसाहेब, रामराम! पुन्हां नाहीं तकलीफ देणार आपल्याला." वीज चमकली तेव्हां तो बुडबुडा नव्हता व त्यावर म्हाताराही नव्हता. झोटिंग व फटिंग इतके बेरड, पण अगदीं भेदरून गेले व त्यांनीं यशवंताची माडीवरच्या कोपऱ्यांतील खोली गांठली. त्यांच्या तोंडांतून शब्द बाहेर पडत नव्हता.

एकदांचें उजाडलें. यशवंताच्या खोलीच्या खिडकींतून बाहेरचा देखावा दिसत होता. कुबेरगढी ओळखूं येत नव्हती. चोहोंकडे भयाण तांबडे व काळे दगड उघडे पडले होते. कांहीं ठिकाणीं चिखलाचे ओंगळ ओघळ दिसत होते! अत्यंत प्राचीन काळापासून सुबत्तेंत शोभणारी व भरभराटींत डुलणारी कुबेरगढी पूर्ण उध्वस्त झाली होती. झाडेंझुडपें, बागबगीचे, पिकें, गुरेंढोरें, गोठे, झोंपड्या आणि सर्व कांहीं पार वाहून गेलें होतें! दोघेही बंधू थंडीनें कुडकुडत व भीतीनें घाबरून हळूच खालीं आले. खालचा मजला सर्व धुऊन गेला होता. धान्य, पैसाअडका, कपडे—जें जें म्हणून वाहून नेणें शक्य होतें, तेवढें सर्व रात्रीच्या पुरानें पार धुऊन नेलें होतें. पण हा पूर आपल्या गढींत आला कोठून व घरांत शिरला कसा याचा त्या दोघां भावांसही विस्मय पडला. खोलींत चिखल झाला होता. चिखलावर रेघोट्या दिसत होत्या. त्यांपैकीं कांहीं रेघोट्यांचीं अक्षरें बनलेलीं दिसत होतीं. दोघांनाही तीं अक्षरें दिसलीं—

'कुबेर--सेवक पश्चिम--मरुत्'

---

म. ग्रं. सं. ठाणें.

## भाग २ रा

देवव्रताच्या पुण्याईचा शेवटीं नाश झाला. कित्येक शतकें सुबत्तेत नांदत असलेली कुबेरगढी आतां निर्जल व निःसार झाली होती. उन्हाळ्यांत वाहणारे थंड वारे व पावसाळ्यांतील पावसाळी वारे बंद झाले. थोडक्यांत सांगावयाचें तर नंदनवनाची मरुभूमि बनली. पाऊस पडणें अगदीं बंद झालें. गढीच्या पलीकडे नित्याप्रमाणें पाऊस पडून हिरवेगार होत असे; पण कुबेरगढीच्या वांटयास एक टिपूसही येईना. झोटिंग व फटिंग यांचा पैसाअडका, धनधान्य सर्व पार धुऊन गेलें होतें. आतां या तीन्ही भावांच्या जवळ यशवंताच्या खोलींतील थोडींफार सोन्याचांदीचीं जुनाट भांडीं व दागिने तेवढे शिल्लक राहिले होते.

दुपारची वेळ भागण्याची पंचाईत पडूं लागली. शेती तर पार सर्व धुऊन गेलेली. तेव्हां कांहीं तरी धंदा हा केलाच पाहिजे.

आपण सोनाराचा धंदा करूं, सोन्यांत लफंगेगिरीनें तांबें मिसळतां येईल व आपणास खूप फायदा होईल असें दोन्ही भावांचें एकमत झालें व त्यांनीं सोनाराची भट्टी लाविली. पण लोक कसले खट ! यांचें ताम्रमिश्रित सोनें ओळखूं येऊन त्यांना मुळीं गिऱ्हाईकच मिळेना. मग भट्टींत घरांतील एक एक चीज टाकावी, यशवंताला भट्टी फुंकावयास लावावें व मिळालेल्या सोन्याचांदीच्या जोरावर जवळचा गुत्ता गांठावा—हा दोन्ही बडया भाईचा कार्यक्रम सुरू झाला. आणि असल्या कार्यक्रमामुळं लवकरच घरांतील सारी मौल्यवान चीजवस्तू नाहींशी झाली यांत काय आश्चर्य ? आतां मौल्यवान् म्हणतां येण्याजोगी एकच चीज घरांत राहिली होती. यशवंताच्या आजोबानें मरतांना त्याला एक सोन्याची विष्णूची मूर्ति दिली होती. तो त्या मूर्तीची रोज मनोभावें पूजा करीत असे. पूजा आटोपून त्या शंखचक्र-

धारी मूर्तीसमोर तो हात जोडून उभा होता. झोटिंगचें त्या मूर्तीकडे लक्ष गेलें. त्यानें बिचाऱ्या यशवंताला एक धक्का मारून बाजूस सारलें; आणि कोनाडयांतून मूर्ति काढून एका मोठया मुशींत ठेविली व ती मूस भट्टींत ठेवून भट्टी पेटविली, आणि यशवंताला भाता चालविण्यास सांगून दोन्ही बंधू गुऱ्याकडे चालते झाले. मूर्ति जड होती तेव्हां कांहीं दिवस तरी चंगळ होणार ही त्यांची भावना होती.

ते गेल्यानंतर यशवंतानें भट्टींतील त्या मुशीकडे पाहिलें, व आपल्या दैवतेच्या मूर्तीचें अखेरचें दर्शन घेतलें. त्याला अत्यंत वाईट वाटलें व कांहीं सुचेनासें होऊन थोडी मोकळी हवा मिळावी म्हणून तो खिडकीजवळ गेला. खिडकींत त्याचें गीतेचें पुस्तक होतें तें त्यानें सहज उघडलें—'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ' या श्लोकार्धावर त्याचे डोळे व चित्त कांहीं काल खिळून राहिलें. त्यानंतर त्याला थोडी हुशारी वाटली. खिडकींतून दिसणाऱ्या देखाव्यानें त्याचें चित्त वेधलें. सूर्यास्ताची वेळ होती. दूरदूरच्या पर्वतांच्या रांगा तांबडया जांभळया दिसत होत्या आणि सुवर्णधारेचा धबधबा अगदीं तप्त सुवर्णाच्या धारेप्रमाणें चकाकत होता; कडयावरून उडया-वर उडया घेतांना उडालेल्या तुषारांवर दुहेरी इंद्रधनुष्य दिसत होतें.

तो मनोहर देखावा पाहून यशवंताच्या मनांत अनेक विचार आलेः व तो मोठयानें म्हणाला, " ह्या सुवर्णधारेचा जर खऱ्याखुऱ्या सोन्याचा प्रवाह बनला तर काय मजा होईल ! "

" छे, छे, चुकतो आहेस तूं ! " एक अगदीं स्पष्ट आवाज त्याच्या कानीं आला.

" अरे, हा रे कोण ? " यशवंतानें आश्चर्यानें उडीच मारली व तो ओरडला !

सर्व स्तब्ध. आसपास चिटपांखरूं सुद्धां नव्हतें. त्यानें कोपरे धुंडाळले; अलमाऱ्यांच्या मागें पाहिलें आणि आपल्या मागें कोणी तरी असेल अशा

संशयानें त्यानें दोनतीन गिरक्या मारल्या. तसाच आवाज पुन्हां त्याला ऐकूं येऊं लागला.

सूं सूं सूं उं उं ऊ—सळ् त्या आवाजांत शब्द नव्हते. सळसळणाऱ्या पाण्याप्रमाणें तो आवाज होता. यशवंताला भास झाला कीं भट्टींतून तो आवाज येत आहे. तो भट्टीजवळ गेला. त्या मुसींतून तो गाण्यासारखा मधुर ध्वनि येतांना त्याला स्पष्ट ऐकूं आला. आश्चर्यातिशयानें व भयानें त्यानें जी उडी मारली, तो खोलीचा एक कोपरा त्यानें गांठला. एकदोन मिनिटें गेलीं, गाण्यासारखे सुरेल सूर बंद झाले व त्याऐवजीं स्पष्ट शब्द ऐकूं येऊं लागले—

" यशवंत, अरे यशवंत ! "

यशवंतानें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

" बाळ यशवंत ! ऐकतो आहेस ना ? "

यशवंतानें आपलें सर्व धैर्य एकवटलें. तो त्या भट्टीजवळ गेला आणि ती मूस पाहूं लागला. सुवर्णाची मूर्ती वितळून त्या सुवर्णाचा पृष्ठभाग चकचकीत दिसत होता. यशवंताला वाटलें नेहमीप्रमाणें त्यांत आपलें प्रतिबिंब दिसेल. पण काय आश्चर्य ! त्या तप्त सुवर्णांतून त्याला ती त्याची आवडती मूर्ति दिसूं लागली. मात्र या वेळीं ती मूर्ती शेंकडोपटीनें तेजानें तळपत होती.

" यशवंता, मला मुशींतून बाहेर ओत बरें." मुशींतील आवाज अगदीं स्पष्ट होता.

यशवंता आश्चर्यानें वेडाच झाला व तो कांहीं न करितां स्तब्ध राहिला.

" ऐकलेंस ना मी काय म्हणतों तें ? मला या तप्त मुशींतून बाहेर ओत पाहूं लवकर."

यशवंतानें आपलें सर्व धैर्य एकवटलें व चिमटयांत ती मूस धरून आंतील सोनें ओतण्याकरितां ती वांकडी केली; पण तिच्यांतून वितळलेल्या सोन्याच्या धारेऐवजीं प्रथम त्याच्या आवडत्या विष्णुमूर्तीचीं पदकमलें

त्याच्या दृष्टीला पडलीं व हळूहळू पितांबर दिसूं लागला. मग हात व हातांतील शंखचक्रगदापद्मादि आयुधें तयार झालीं व एका क्षणांत त्याच्यासमोर त्याची विष्णुमूर्ती उभी साक्षात् राहिली.




क्षणांत त्याच्यासमोर त्याची विष्णुमूर्ति उभी राहिली !

यशवंतानें त्या मूर्तीला भक्तीनें साष्टांग प्रणाम केला; व तो म्हणाला, "देवाधिदेवा, माझ्या दोन्ही भावांच्या अपराधांची क्षमा कर व पूर्ववत् आमच्या येथें सुबत्ता नांदूं दे."

मूर्ती बोलूं लागली, "मुला, मी एक विष्णुदूत असून हिमालयाच्या या भागाचें व विशेषतः सुवर्णधारेचें आधिपत्य माझ्याकडे आहे. तुझा पूर्वज देवव्रत याच्या तपश्चर्येनें मीं या मूर्तीमध्यें तेजोरूपानें वास्तव्य केलें होतें. तुझ्या दोन्ही भावानीं पूर्वपुण्याईचा सर्व सांठा खर्चून टाकला आहे; व त्यामुळें मला येथें वास्तव्य करणें शक्य नाहीं. तथापि तुझे सद्‌गुण पाहून मी तुजवर प्रसन्न झालों आहे. तरी मी सांगतों तें नीट ध्यानांत ठेवून

त्याप्रमाणें वागलास तर तुमच्या येथें पुन्हां लक्ष्मी नांदूं लागेल. सुवर्णधारा जेथून पडत आहे त्या पर्वतावर चढून आपल्या येथील विष्णुमंदिरांतील देवाच्या तीर्थाचे तीन थेंब त्या प्रवाहांत टाक, म्हणजे सुवर्णधारा ही खरोखर सुवर्णमय बनेल. प्रथम प्रयत्न फसला, तर दुसरा प्रयत्न यशस्वी होणार नाहीं; आणि जर कोणी सुवर्णधारेवर अपवित्र जलसिंचन केलें तर तो त्या धारेच्या ओघांत सांपडून काळा पाषाण बनेल."

बोलणें संपतांच मूर्तीनें त्या रसरशीत भट्टींत प्रवेश केला. मूर्ति तांबडी, नंतर पांढरी, नंतर झगझगीत होऊन तिचें एका दिव्य ज्योतीत रूपान्तर झालें व ती ज्योत सुवर्णधारेकडे तुटणाऱ्या ताऱ्याच्या वेगानें जातांना नजरेस पडली.

यशवंता भानावर आला. इतक्यांत मूर्तीचें तयार झालेलें सोनें घेण्याकरितां झोटिंग व फटिंग दारूच्या धुंदींत धडपडत घरांत आले.

दारूची धुंदी असली तरी मुशीमध्यें व बाहेर सोन्याचा कणही दिसत नाहीं ही गोष्ट दोघांच्याही तेव्हांच ध्यानांत आली; आणि अधिक विचारपूस करण्याची दगदग न करितां त्यांनीं यशवंताला खूप बडविलें. नंतर कांहीं वेळानें तेथीलच रकट्यावर बसून त्यांनीं विचारपूस केली. तेव्हां यशवंतानें घडलेली सर्व हकीकत त्यांना सांगितली. त्या गोष्टीवर त्यांचा विश्वास अर्थातच कांहीं बसेना. तेव्हां झोपीं जाण्यापूर्वी यशवंताला थोडी मारपीट करून ते दोघेही झोपीं गेले. सकाळीं उठल्यावर मात्र शुद्धीवर येऊन त्यांनीं सुवर्णधारेच्या शोधार्थ जाण्याचें ठरविलें. पण हा भाग्याचा वांटा कोणी उचलावा याबद्दल प्रथम वाद, मग बोलाचाली व शेवटीं तरवारी उपसून मारामारी या क्रमानें झोटिंग-फटिंगांचें भांडण वाढतच चाललें. शेजारीपाजारी जमा झालें. पाटील, पटवारी, कोतवाल यांना बोलावणें गेलें. तेव्हां झोटिंगनें हळूच पाय काढला व फटिंग पकडला जाऊन पंचायतीसमोर उभा केला गेला. त्याला प्राणघातक दांडगाईबद्दल दंड झाला. पण दंड देण्याला जवळ एक कपर्दिकही नसल्यामुळें फटिंगची रवानगी तुरुंगांत झाली. हें ऐकून झोटिंगला

अत्यानंद झाला; व त्यानें सुवर्णधारा गांठण्याची खटपट करण्याचें ठरविलें. रात्रौ पुजाऱ्याकडे तीर्थ मागण्यास झोटिंगाची स्वारी गेली; पण या प्रसिद्ध अपवित्र व्यक्तीला पवित्रोदक देण्याचें पुजाऱ्यानें साफ नाकारलें. तेव्हां झोटिंगानें संधि साधून तीर्थाची झारीच लांबविली व मिशांवर तांव देत घर गांठलें.

प्रातःकाळीं एका पडशींत कांहीं खाद्यपेय पदार्थ व हें चोरलेलें तीर्थ घेऊन झोटिंगची स्वारी हातांत दंडा घेऊन पर्वतावर आरोहण करण्यास सिद्ध झाली. झोटिंग झपाझप पर्वत चढूं लागला; पण त्यामुळें तो लवकर थकला. मोठ्या नेटानें त्यानें पहिल्या रांगेंतील एका टेकडीचें शिखर गाठलें; तों समोर एक मोठी हिमनदी त्याला दिसली. सुवर्णधारेला पोहोंचण्यास हिमनदी ओलांडावी लागेल याची त्याला कल्पनाही नव्हती.

झोटिंग कांहीं डगमगला नाहीं. त्याला नेहमींचा सराव असल्यामुळें त्यानें ती नदी ओलांडण्यास सुरुवात केली; पण इतका भयंकर प्रवास त्यानें पूर्वीं कधींही केलेला नव्हता. बर्फ अतिशय निसरडें होतें; आणि त्यांतील भयंकर खोल अशा घळींतून पाण्याचा सूं सूं आवाज येत होता. मधून मधून बर्फाचे कडे आजूबाजूनें धाड धाड कोसळत होते. त्याच्या पाया-खालील बर्फ हादरत होतें; व मधून मधून येणाऱ्या भयंकर घळींवरून उड्या मारतांना त्याच्या अगदीं नाकीं नऊ आले. शेवटची बर्फांतील घळ तर फारच भयंकर होती; पण दृढ निश्चयानें त्यानें तिच्यापार उडी मारली व पलीकडील जमिनीवर तो थकून पडला. पुढला रस्ता तांबुस काळ्या रंगाच्या कड्यांवरून जात होता. त्या भयाण डोंगरावर गवताची एक काडीही उगवलेली दिसत नव्हती. चोहोंकडे रखरखीत असल्यानें दुपारच्या उन्हाचा ताप असह्य होऊं लागला. सर्व वातावरण रखरखीत भासत होतें. झोटिंग थकला तर होताच; पण त्याला आतां भयंकर तहान लागली. त्यानें पाठीवरील पडशींतून तीर्थाचा चंबू काढला व त्याच्याकडे तो पाहूं

लागला–' सुवर्णधारेवर टाकायला फक्त तीन थेंबच तर हवे आहेत. मग या पाण्यानें थोडे ओठ ओले करण्यास काय हरकत आहे ! '

त्यानें चंबूचें बूच उघडलें व तो तोंडास लावणार, इतक्यांत त्याला त्याच्या जवळच खडकावर कांहीं हालचाल होत आहेसें वाटलें. तें एक लहानसें कुत्रें होतें. तहानेनें व्याकूळ होऊन मरणाच्या शेवटच्या क्षणाच्या यातना त्याला होत होत्या. त्याची जीभ बाहेर लोंबत होती. त्याचे ओठ कोरडे पडले होते, आणि त्याच्या तोंडावर व ओठांवर काळ्या मुंग्यांचे थवेच्या थवे चिकटले होते. त्या कुत्र्यानें आपली दृष्टि झोटिंगच्या हातांतील पाण्याच्या बाटलीकडे वळविली. झोटिंगानें बाटली उचलली, तोंडास लाविली व थोडें पाणी पिऊन पुढें जातांना त्या कुत्र्यास लाथाडून तो मार्गाला लागला.

पुढील वाट अधिकच बिकट होती व चढावही अधिकाधिक वाढूं लागला होता: त्या पर्वतावरील उष्ण हवेनें त्याचें मस्तक तापूं लागलें. त्याची तहान पुन्हां तीव्र झाली; व एकएक क्षण त्याला कठीण जाऊं लागला. त्यानें नेटानें प्रवास तसाच चालू ठेवला. एक तास गेला असेल त्यानंतर, त्यानें बाटली काढून पाहिली. ती अर्धीअधिक रिकामी झालेली असली तरी तीन थेंबांपेक्षां पुष्कळच अधिक पाणी तिच्यांत होतें. तो थांबला, त्यानें बाटलीचें बूच उघडलें. इतक्यांत अगदीं त्याच्या समोरच कांहीं हालचाल झाली. त्याच्यासमोरच तप्त खडकावर एक लहान सुंदर मूल निश्चेष्ट पडलेलें होतें. त्याचे ओठ सुकलेले होते. तें मधून मधून हलकेंच जीभ बाहेर काढीत होतें. त्याचे डोळे मिटलेले असून त्याची छाती मात्र धडधडत होती. , झोटिंगानें त्याच्याकडे क्षणभर पाहिलें; व आपण स्वत: बाटलींतील पाणी पिऊन तो पुढें चालूं लागला.

झोटिंगाची हिंमत दांडगी होती. तो सारखा मार्ग काढीत होता. आतां सूर्य कलला होता; पण त्यामुळें थंडावा मात्र आला नव्हता. आतां त्याचें

ध्येय अगदीं नजरेनें दिसूं लागलें होतें. समोरच्या लहानशा टेकडीवरून पडणारी सुवर्णधारा आतां त्याच्या अगदीं नज़ीक होती. तो दम घेण्यास म्हणून एक क्षणभरच थांबला; व लागलीच मोठ्या हिंमतीनें पुढील मार्गावर त्यानें झेप घेतली.

त्याच वेळी अगदीं अशक्त अशा कण्हण्याचा आवाज त्याच्या कानीं आला. त्यानें वळून पाहिलें तो बाजूच्या खडकावर एक म्हातारा अत्यवस्थ स्थितींत पडलेला त्याला दिसला. त्याचे डोळे खोल गेले होते; आणि त्याचा फिकट चेहरा निराशाग्रस्त दिसत होता.

" पाणी, पाणी–" आपले निस्त्राण हात झोटिंगाकडे पसरीत म्हातारा अगदीं खोल आवाजांत म्हणाला–" पाणी--मी तहानेनें मरत आहे."

" कांहीं फिकीर नाहीं मेलास तर, आतां जगून तरी काय करणार आहेस ? " असें म्हणत वाटेवर बेशुद्ध पडलेल्या म्हाताऱ्याला ओलांडून तो पुढें निघाला. पूर्वेकडे सुवर्णधारेचा धो धो आवाज झोटिंगाच्या कानांत दुमदुमूं लागला. एका क्षणांत तो सुवर्णधारेच्या कडयावर येऊन पोहोंचला. सूर्याच्या लाल किरणांनीं पाणी तांबडें लाल दिसत होतें. वर उसळणारें पाणी अग्नीच्या ज्वालांप्रमाणें चमकत होतें; आणि पाण्यावरील फेसावरही ते तांबडे लाल किरण तळपत होते. पाण्याच्या धबधब्याचा आवाज फारच जोराचा होऊं लागला; आणि त्या आवाजानें झोटिंगाला घेरी आल्यासारखें वाटूं लागलें. त्यानें पडशींतून तीर्थाचा चंबू काढला. त्यानें एकदां चंबूकडे पाहिलें व तो चंबूच त्यानें त्या प्रवाहांत भिरकावून दिला. पण लागलीच त्याला हुडहुडी भरल्यासारखें वाटलें. त्याचा तोल गेला व एक मोठी किंकाळी फोडून तो खालीं पडला. पाणी खूप जोरानें वर उसळलें; आणि धों धों आवाज करीत नदी पुन्हां वाहूं लागली. झोटिंगचें काय झालें ?

......एक काळा फत्तर !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
ग्रं. क्र. ७१०९ नों. दि ........
वि. ... ... क्र. ........
म. ग्रं. सं. ठाणें.

## भाग ३ रा

गरीब बिचाऱ्या यशवंतानें झोटिंगाची खूप वाट पाहिली; पण व्यर्थ. तो परत न आल्यानें त्याला फारच भय वाटूं लागलें. मग तो फटिंगाच्या भेटीला तुरुंगांत गेला; आणि त्यानें त्याला सर्व हकीकत सांगितली. फटिंगाची स्वारी हें ऐकून खूप खूष झाली; कारण इतके दिवस ज्या अर्थी झोटिंग परत आला नाहीं त्या अर्थी तो काळा फत्तर बनला असला पाहिजे याबद्दल त्याला मुळींच शंका उरली नाहीं. आणि आतां यानंतर सुवर्णधारेचें सर्व सोनें आपणाला एकट्याला मिळणार म्हणून तो आनंदित झाला. बिचाऱ्या यशवंताला मात्र फार वाईट वाटलें; व तो रात्रभर रडत राहिला. सकाळीं उठल्यावर त्यानें पाहिलें तो घरांत एकही पैसा अगर धान्याचा कण नाहीं. मग यशवंता एका सोनाराकडे मजुरीनें राहिला. तो काळजीपूर्वक, कष्टाळूपणें व न कंटाळतां काम करीत असे. त्यामुळें लवकरच फटिंगाचा दंड देण्यापुरते पैसे त्याच्याजवळ जमले. तेव्हां त्यानें दंड भरून फटिंगाची सुटका करवून घेतली. फटिंगाची स्वारी यशवंतावर फार खूष झाली; व सुवर्णधारेच्या सोन्यापैकीं कांहीं सोनें तुलाही मी देईन असें तो यशवंताला म्हणाला. पण यशवंता त्याला म्हणाला, "मला सोन्याची फिकीर नाहीं. फक्त आपल्या दादाची काय हकीकत आहे पाहून या."

झोटिंगानें तीर्थ चोरून आणलें होतें ही हकीकत फटिंगाला माहीत झाली होती. तेव्हां अशा तऱ्हेनें तीर्थाचा पवित्रपणा नाहींसा झाला असावा असें स्वतःशीं ठरवून, सुवर्णधारेच्या देवतेला चांगल्या रीतीनें खूष करण्याचें त्यानें ठरविलें. त्यानें यशवंताजवळून कांहीं पैसे मागून घेतले; व एका

पंड्याला गांठून त्याला कांहीं पैसे देऊन बिनबोभाटपणें एक तांब्याभर तीर्थ मिळविलें.

आपण योग्य तेंच करीत आहोंत, अशी फटिंगाला खात्री वाटत होती. दुसऱ्या दिवशीं सकाळींच उठून त्यानें शिदोरी बांधली; व तीर्थाची भरलेली बाटली पडशींत टाकून तो पर्वतावर निघाला. त्याच्या भावाप्रमाणेंच त्यालाही तो मार्ग मोठा अवघड वाटला.

नदी पाहून त्याला आश्चर्य वाटलें. त्यानें मध्यंतरीं फराळ केला व तीर्थाची बाटली शिवाय करून बाकी सर्व जिनसा मध्येंच टाकून दिल्या. पण हिमनदी ओलांडतांना त्याच्या नाकीं नऊ आले. तहानेनें तो अगदीं व्याकुळ झाला. बाटलींतील थोडें तीर्थ प्यावें या विचारानें त्यानें बाटली उघडली, तोंच एक अगदीं लहान मूल पाण्याशिवाय मरणाच्या द्वारीं पडलेलें व पाण्याकरितां कण्हत असलेलें त्याच्या दृष्टीस पडलें.

" स्वतःपुरतें पाणी माझ्याजवळ नाहीं आणि त्यांतून या पोटर्‍याला पाजणें म्हणजे महामूर्खपणाचें होईल," असें म्हणत फटिंग पुढें चालूं लागला.

त्यानें आणखी एक तासभर मजल मारली. त्याला पुन्हां भयंकर तहान लागली. त्यानें पाणी पिण्याकरितां बाटली हातांत घेतली, तोंच त्याला 'पाणी' 'पाणी' म्हणून कण्हत असलेला अगदीं म्हातारा मनुष्य दिसला. " वा रे थेरड्या ! तुला पाणी देऊन मी मरूं होय ! " असें म्हणत तो पुढें चालूं लागला.

सूर्य आतां मावळण्याच्या बेतांत आला होता. ढग हळुहळू वर सरकून सूर्याला आच्छादून टाकण्याच्या बेतांत होते. ढगांची किनार खवळलेल्या समुद्राप्रमाणें दिसत होती. फटिंगाच्या वाटेवर चित्रविचित्र छाया पसरल्या होत्या.

तो एकसारखा मार्ग काढीत होता. त्याला पुन्हां तहान लागली. त्याचा घसा कोरडा पडला. त्यानें बाटलींतील पाण्याकडे पाहिलें. अद्याप थोडें पाणी

शिल्लक होतें. त्यानें बूच उघडलें व बाटली उचलली. इतक्यांत अगदीं वाटेंतच झोटिंग पडलेला त्याला दिसला. त्यानें नीट न्याहाळून पाहिलें. झोटिंगानें 'पाणी' म्हणून आपले हात पसरले.

"योग्य, वाः अगदीं योग्य! आपली स्वारी येथें पडली आहे वाटतें. मला तुरुंगांत धाडल्याचें विसरलांत वाटतें? हें तीर्थ मीं इतक्या दूर तुझ्याकरतां आणलें अशी का तुझी कल्पना आहे?" त्यानें आपल्या भावाला ओलांडलें व तो पुढें चालूं झाला. थोडें पुढें जाऊन त्यानें मागें वळून पाहिलें, तों झोटिंग त्याला दिसला नाहीं.

फटिंगाच्या मनांत भीतीचा धक्का बसला; पण तो पुढेंच चालूं लागला. सोनें! सोनें! सोन्याकरितां हपापलेल्या त्याच्या मनाला कोणतेंही भय भेडसावूं शकलें नाहीं.

सर्व आकाश काळ्याकुट्ट ढगांनीं व्याप्त झालें होतें. फटिंग आतां सुवर्णधारेच्या अगदीं किनाऱ्यावर उभा होता. सुवर्णधारेचें पाणी रात्रीच्या छायेंत काळेंभोर दिसत होतें. पण लाटांवरील फेस अग्निज्वालेसारखा दिसत होता. पाण्याच्या गर्जनेबरोबर ढगांचा गडगडाट सुरू होता.

फटिंगानें तीर्थाची बाटली काढली. तिच्यांत अद्याप थोडेंसें तीर्थ होतें. त्यानें बूच उघडलें व बाटलीच्या बाटलीच नदींत भिरकावून दिली. त्याबरोबर विजेची एक विलक्षण चमक चमकली आणि त्याचे डोळे दिपून गेले. त्याचा पाय निसटला आणि तो धाड्कन् त्या धबधब्यांत पडला.

दोन मोठाल्या काळ्या दगडांवरून पाणी धो धो करीत वाहूं लागलें!

× × ×

फटिंगाची वाट पाहून यशवंत थकला. पण उपयोग काय? त्याला फार वाईट वाटलें. जवळ पैसाही शिल्लक नव्हता; म्हणून त्यानें पुन्हां एका सोनाराकडे नोकरी धरली. एकदोन महिने कसून मेहनत केल्यावर त्याच्या गांठीं थोडा पैसा जमला. तेव्हां त्यानें सुवर्णधारा मिळविण्याची खटपट करण्याचें ठरविलें.

त्याच्या नजरेसमोर पूर्वी पाहिलेली विष्णुदूताची दयासंपन्न मूर्ति दिसूं लागली; व आपल्यावर 'काळा फत्तर' बनण्याची पाळी येणार नाहीं असें त्यास वाटलें.

एके दिवशीं प्रातःकाळीं शुचिर्भूत होऊन यशवंत देवळांत गेला. त्यानें मागतांच पुजाऱ्यानें त्याला तीर्थ दिलें. देवास भक्तिपुरस्सर प्रणाम करून तो पर्वताच्या मार्गानें निघाला.

तो पर्वताचा मार्ग छोट्या यशवंताला तर फारच कठीण वाटूं लागला, व तो अनेकदा ठेंचाळला, पडला; एकदां तर त्याची शिदोरीची गांठोडी खोल दरींत पडून गेली. अर्धा मार्ग आक्रमण केला असेल नसेल तोंच त्याची तहानेनें प्राणान्तिक अवस्था झाली.

त्याच्या भावांच्याप्रमाणेंच त्यानेंही थोडेंसें तीर्थ पिण्याचें ठरविलें. त्यानें तीर्थाचा चंबू उघडला. इतक्यांत एक अत्यंत जख्खड व अशक्त म्हातारा काठी टेकीत त्याच्याकडे येतांना त्याला दिसला. म्हातारा म्हणाला,

"मुला, मी तहानेनें अगदीं व्याकुळ झालों आहें, मला त्या चंबूंतील थोडें पाणी देतोस काय?"

यशवंतानें त्याच्याकडे पाहिलें. म्हातारा अगदीं निःशक्त व आजारी दिसत होता. त्याला पाहून यशवंताच्या अंतःकरणांत करुणा उत्पन्न झाली. त्यानें म्हाताऱ्याला चंबू दिला व म्हटलें, "म्हातारेबाबा, हें घ्या तीर्थ; पण तें सबंध पिऊं नका हं!"

त्या म्हाताऱ्यानें चंबूंतील बरेंचसें तीर्थ खलास केलें; व चंबू परत केला. त्यांतील अर्धें अधिक तीर्थ खलास झालें होतें. यशवंतानें आपल्या हातावर थोडें तीर्थ घेऊन आपले ओठ ओले केले व तो उत्साहानें आपल्या पुढील मार्गाला लागला.

पुढील मार्ग त्याला थोडा सुखावह वाटूं लागला.

आणखी एक तास गेला. त्याला पुन्हां तहान लागली म्हणून त्यानें चंबू हातांत घेतला. तेव्हां एक लहान मूल रस्त्याच्या बाजूस पडलेलें त्याच्या

नजरेस पडलें. तें कण्हत होतें; व अत्यंत करुण स्वरांत 'पाणी' 'पाणी' असें ओरडत होतें.

त्याला खरोखर अतिशयच तहान लागली होती. यशवंतानें लागलीच तीर्थाचा चंबू त्या मुलाच्या तोंडास लाविला. त्या मुलानें बहुतेक सर्व तीर्थ खलास केलें. आतां चंबूंत फक्त कांहीं थेंब उरले होते. मुलाच्या अंगांत पाणी मिळाल्यानें हुशारी आली. त्यानें चंबू परत केला. यशवंताकडे सुहास्य नजरेनें पाहून त्यानें टेकडीच्या खालीं धूम ठोकली.

यशवंतानें पुन्हां चढण चढण्यास सुरुवात केली. या मार्गाच्या आजू-बाजूस सुंदर मधुर फुलें फुललीं होतीं. त्या फुलांवरून सुरेख फुलपांखरें उडत होतीं. सूर्याचे कोमल किरण चोहों बाजूंस पडल्यानें देखावा उज्ज्वल दिसत होता. यशवंतानें उल्हासानें मार्ग आक्रमण करण्यास सुरुवात केली.

आणखी एक तास लोटला. त्याला पुन्हां तहान लागली. त्यानें चंबू उघडून पाहिला. त्यांत आतां जेमतेम पांचसहा थेंब तीर्थ उरलें होतें. तेव्हां तें पिण्याचा विचार करणें अशक्यच होतें. म्हणून चंबू फिरून पडशींत टाकणार तों खडकावर एक लहान कुत्रें धापा टाकीत असलेलें दिसलें. यशवंतानें थांबून कुत्र्याकडे पाहिलें; आणि नंतर तेथून दिसणाऱ्या सुवर्णधारेकडे पाहिलें, आणि तो पुढें चालूं लागला. पण तें कुत्रें इतकें करुणास्पद रीतीनें कण्हत होतें कीं त्याचें तेथून पाऊल उचलेना.

" अरेरे ! काय दशा झाली आहे या प्राण्याची ! मी सुवर्णधारेहून परत येईन तोंपर्यंत हें मरून जाईल !" त्यानें पुन्हां त्या सुंदर जलधारेकडे पाहिलें आणि त्याला विष्णुदूताच्या बोलण्याची आठवण झाली कीं, सुवर्णधारा प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न प्रत्येकाला एकदांच करतां येईल. त्यानें पुन्हां पुढें चालूं लागण्याचा प्रयत्न केला. त्या कुत्र्यानें त्याच्याकडे अगदीं हृदय-भेदक नजरेनें पाहिलें. त्याच्यानें त्या कुत्र्याची स्थिति बघवेना.

"मरूं दे तें सोनें व तो विष्णुदूत" असें म्हणून यशवंतानें चंबू उघडला आणि त्यानें त्या कुत्र्याचें तोंड उघडून त्यांत सर्व तीर्थ ओतलें.

एकदम—अगदीं एका क्षणांत—तें कुत्रें ताड्कन् मागील पायावर उभें राहिलें. त्याची शेंपटी नाहींशी झाली. त्याचा रंग बदलूं लागला व त्याच्यावर सोनेरी झकाकी दिसूं लागली. त्याचें नाक तांबडें झालें, डोळे चमकूं लागले व हे सर्व फरक इतके झपाट्यानें झाले कीं, डोळ्यांचें पातें लवतें न लवतें तों तें कुत्रें अदृश्य झालें व त्याच्या जागीं यशवंताच्या जुन्या परिचयाचा विष्णुदूत, सुवर्णधारेचा अधिमन्त्री तेथें प्रगट झाला.




**यशवंताच्या जुन्या परिचयाचा विष्णुदूत तेथें प्रगट झाला**

यशवंत अगदीं आश्चर्यचकित झाला. विष्णुदूत म्हणाला, " फार छान ! मुला, घाबरूं नकोस; सर्व कांहीं ठीक आहे; पण तूंच याच्या पूर्वीं कां आला नाहींस? आपल्या दुष्ट भावांना तूं पाठविल्यामुळें त्यांना काळे फत्तर बनवावें लागलें."

" काय ! आपण खरोखरीच इतक्या निष्ठुरतेनें त्यांना वागविलें ? " यशवंतानें विचारलें.

" निष्ठुरता ? कसली आली आहे निष्ठुरता ? त्यांनीं सुवर्णधारेंत अपवित्र पाणी ओतलें या अपराधाची क्षमा कधींही होणें शक्य नाहीं."

" असें कसें म्हणतां ? त्यांनीं विष्णुमंदिरांतून तीर्थ आणलेलें मला माहित आहे."

" होय, असेल कदाचित् ! पण ज्या तीर्थाचा उपयोग निःशक्त व मरणोन्मुख प्राण्यांना होत नाहीं, तें कोठूनही आणलेलें असो, माझ्या दृष्टीनें तें अपवित्रच ठरतें."

विष्णुदूतानें खालीं वांकून तेथील एक लहानसें कमलपुष्प तोडलें. त्याच्या पाकळ्यांवर मोत्याप्रमाणें चमकणारे दंवाचे थेंब होते. यशवंताच्या हातांतील चंबूंत त्यानें ते थेंब टाकले.

" जा, तुझ्या या पवित्र चंबूंतील पाण्याचे हे थेंब सुवर्णधारेंत टाक; आणि पर्वताच्या पलीकडील बाजूनें कुबेरगढीला परत जा."

बोलणें संपतांच विष्णुदूताची मूर्ति अदृश्य होऊं लागली. मूर्तीभोवतीं इंद्रधनुष्याच्या रंगाचें सुंदर चक्र दिसूं लागलें. यशवंता हात जोडून उभा होता. एका क्षणांत विष्णुदूत अदृश्य झाला.

यशवंता थोड्याच वेळांत सुवर्णधारेच्या कांठावर पोहोंचला. त्याच्या लाटा स्फटिकासारख्या चकाकत होत्या, व पाण्यावर सूर्यकिरण लकाकत होते. यशवंतानें ते दंवाचे थेंब प्रवाहांत टाकले आणि काय होतें तें पाहत तो उभा राहिला.

—पण त्याची निराशा झाली; कारण त्या पाण्याच्या नामधारी सुवर्णधारेचें खऱ्या सोन्यांत रूपान्तर होण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. इतकेंच नव्हे तर त्या धारेचें पाणी थोडें कमी कमी होत आहे, असेंही त्याला वाटलें.

त्यानें एक सुस्कारा टाकला; आणि तो विष्णुदूतानें सांगितल्याप्रमाणें पर्वताच्या दुसऱ्या बाजूनें खालीं उतरला. वाट चालत असतांना जमिनींतून पाणी वाहत असल्याचा आवाज त्याला ऐकूं येऊं लागला.

लवकरच तो कुबेरगढीशीं येऊन पोहोंचला. त्या जागीं एका खडकांतून सुवर्णधारेप्रमाणेंच एक नदी वाहातांना पाहून त्याला अत्यंत आश्चर्य वाटलें. त्या नदीचे अनेक फाटे कुबेरगढीच्या खोऱ्यांतून वाहूं लागले होते.

त्या देखाव्यावर यशवंताची नजर खिळून राहिली. कारण पाहतां पाहतां प्रवाहाच्या आजूबाजूस हिरवळ दिसूं लागली, वेली उगवल्या आणि सायंकाळीं आकाशांत एकामागून एक तारका चमकूं लागतात त्याप्रमाणें फुलें उमलूं लागलीं. झाडें वाढूं लागलीं आणि पर्वताची बाजू झाडाझुडपांनीं, अरण्यांनीं आच्छादून गेली. आणि याप्रमाणें कुबेरगढी फिरून पूर्ववत् बगीच्याप्रमाणें शोभूं लागली. निर्दयपणें गमावलेली सुबत्ता प्रेमानें परत मिळविली !

यशवंत आपल्या घरीं परत आला; आणि तेथें सुखांत राहूं लागला. त्याच्या दारांतून गरीबांना रिक्त हस्तें कधींच परतावें लागत नसे. त्याची संपत्ति वाढूं लागली. त्याचीं कोठारें धान्यानें व त्याच्या संपत्तीनें भरून गेलीं. आणि अशा रीतीनें ती नदी विष्णुदूतानें सांगितल्याप्रमाणें त्याला सुवर्णधारेसारखी लाभदायक झाली.

अद्यापपर्यंत या खोऱ्यांतील लोक सुवर्णधारेचा मूळ धबधबा दाखवितात व याच प्रवाहांत यशवंतानें दवाचें थेंब टाकले होते म्हणून सांगतात. त्याचप्रमाणें सुवर्णधारा जमिनीखालून गुप्त रूपानें ज्या मार्गानें येते तो मार्गही पण ते दाखवतात. मूळ धबधब्यांत अद्यापि दोन मोठाले काळे फत्तर दिसतात; आणि त्यांच्याभोवतीं धबधब्याच्या पाण्याचे भोंवरे फिरत असतात. या गढींतील लोक या फत्तरांना अद्याप 'दोन दुष्ट भाऊ' या नांवानें ओळखतात.

म. ग्रं. सं. ठाणे

# मोह

विंध्य व सातपुडा पर्वतांमधील अरण्यें किती पण घनदाट ! आणि त्यांतून वाहणारे अनेक ओहोळ, ओढे, छोटया नद्या यांच्या कांठांनीं उगवलेल्या बांबूंच्या बेटांची गर्दी, पुरुष–पुरुष वाढलेले कळक, गवत व कांटेरी रानटी झुडपें, असंख्य रानवेलींच्या गुंतागुंतीच्या गुंफा, हीं सर्व या टेकाडावरून नजरेसमोर दिसलीं, कीं या अरण्यांत मनुष्यवस्ती असण्याचा संभव आहे अशी कल्पना सुद्धां कोणाच्या डोक्यांत येणार नाहीं. या दाट गुंतागुंतींतून मार्ग काढणें अगदीं अशक्यच; मग तेथें मनुष्यसंचार तरी कसा असणार ? खरें ना ? या अरण्याकडे पाहून आत्तां–या काळांत सुद्धां आपणाला असें वाटतें, मग मीं जर तुम्हाला सांगितलें कीं शंभर वर्षांपूर्वी याच–या टेकडीलगतच्या मावळत्या बाजूच्या–अरण्याचा कांहीं लोकांनीं आश्रय केला होता, व हेंच त्यांचें कायमचें निवासस्थान होऊन राहिलें होतें, तर वाटेल तुम्हाला खरें ?

इंग्रज सरकारनें मध्य हिंदुस्थानांतील अनेक संस्थानें खालसा करून तेथील फौजा कमी केल्यामुळें फौजेंतून सुटलेल्या कित्येक धाडसी भिल्लांनीं वाटमारीचा उद्योग सुरू केला; व मग सरकारी पकडापकडींतून अगदीं बेमालुम व निर्धास्त छपून बसण्याला या घोर अरण्याचा त्यांनीं आश्रय घेतला. त्यांचा जन्म मुळीं असल्याच अरण्यांतून गेलेला; तेव्हां ते सहजीं या अरण्यांत गडप होऊन जात. एकदां का त्यांनीं ती पलीकडची दरड ओलांडून या अरण्यांत दडी मारली कीं, सरकारी पोलिस मुकाटयानें हात हालवीत येथूनच परत फिरत. पण यांतूनही क्वचित प्रसंगीं एखादी संधि त्यांना मिळे; कारण या भिल्लांनीं सैन्यांतील बंदुका लांबविल्या होत्या; पण दारूगोळा संपला कीं लपून छपून वेषांतर करून, अनेक युक्त्या-

प्रयुक्त्या करून जवळच्या शिवापूर संस्थानांतून तो विकत आणण्याकरितां त्यांना त्यांच्या आश्रयस्थानाबाहेर पडावेंच लागे.

आतां जरा या बाजूला—म्हणजे उगवत्या दिशेला नज़र टाका. त्या दाट राईतून धूर चक्राकार मंदगतीनें हळूहळू आकाशांत चढत आहे ना? तेथेंच एक झोपडी आहे. ती किती जुनी आहे कोणाला ठाऊक? पण शंभर वर्षांपूर्वी ती झोपडी अगदीं अलग अशीच तेथें होती. दिसतें ना तिचें गवती छप्पर? तेथें–हां तेथेंच–विक्रमसिंग राहात होता. जरा नीट दूरवर पाहिलेंत तर तो पाहा—शिवापुरांतील महादेवाच्या देवळाचा पांढरा सफेत घुमटही दिसेल तुम्हाला. हो, अगदीं तेथेंच–त्या वरवर चढणाऱ्या धुराच्या–हं–जरा या बाजूला, बस–तेंच शिवापूर. तसें फार दूर नाहीं. असेल चारपांच मैल येथून.

विक्रमसिंग या टापूंत फारच सुविख्यात होता. त्याची थोडीफार शेती होती व विशेष म्हणजे मेंढयांचे दोनतीन चांगले कळप होते. त्यामुळें तो त्या जमातींत सुखवस्तू समजला जात असे. पण त्याच्या प्रसिद्धीचें मुख्य कारण त्याची अगदीं अचूक निशाणबाजी. त्यानें एकदां कां एखाद्या प्राण्यावर बंदुक रोखली, मग तें मेंढरू असो, हरीण असो, अगर वाघोबा असोत, एका बारांत त्या प्राण्याचा कपाळमोक्ष झालाच म्हणून समजा. तो सहसा कोणाच्या वाटेला जात नसे; पण जर का त्याची खोडी एखाद्यानें काढली कीं, कठीणच प्रसंग. एकदां एका नवख्या टारगटानें त्याच्या घरधनिणीशीं जरा लगट केली. त्यानंतर तो आपल्या झोपडीच्या दारांत बसून आरशांत पाहून आपले मिशीचे पांढरे केस चिमटयानें काढीत होता. इतक्यांत एकाएकीं त्याच्या हातांतील आरसा गोळी लागून अगदीं चक्काचूर झाला. त्यानें वळून पाहिलें तों पन्नास कदमावरून विक्रमसिंग खांद्यावर बंदुक टाकून शांतपणें चालला होता. एवढी जबरदस्त व गंभीर सूचना अर्थात्‌च त्याला पुरेशी झाली. त्यानें ताबडतोब त्या भागांतून पोबारा केला.

विक्रमसिंगाचा निर्भयपणा, सीधा स्वभाव, कोणाच्याही कामांत लुडलुड न करण्याची गंभीर वृत्ति, व विशेषतः त्याची अचूक बंदूक यांमुळें संस्थानी पोलिस खात्यांतील लोकांवर व नजीकच्या अरण्यांतील त्याच्या भाईबंदावर त्याचा चांगलाच वचक होता.

त्याला लागोपाठ तीन मुलीच झाल्या. त्यामुळें तो अगदीं वैतागून गेला होता. सुदैवानें उतारवयांत चाळीस–पंचेचाळिसीच्या सुमाराला त्याला एक मुलगा झाला. अर्थातच छोटा मोहन्या त्याला अगदीं जीव कीं प्राण वाटूं लागला. तीन्ही मुलींचीं लग्नें झालीं होतीं, त्यांना स्थळेंही पण चांगलीं मिळालीं होतीं. अडीअडचणीच्या वेळीं सारे जांवई सासऱ्याच्या मदतीला धांवून येण्यास तत्पर असत. मोहन्या मोठा खेळकर व हुशार! आणि नेमबाजींत तर ‘बापसे बेटा सवाई’ निघण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. तो कोठेंहि असो, त्याच्या हातांत धनुष्यबाण असायचाच, व पाडाला आलेलें फळ बाणानें नक्की टिपून खालीं पाडण्यापर्यंत दहाव्याच वर्षीं त्याची मजल गेली होती.

जरा दूरच्या जंगलांतील आपला मेंढयांचा एक कळप एकदां नजरेखालीं घालावा म्हणून विक्रमसिंग आपल्या बायकोसह एके दिवशीं सकाळींच बाहेर पडला. मोहन्याहि अर्थातच त्यांच्याबरोबर जाण्यास निघाला. पण तें जंगल बरेंच दूर होतें व घर संभाळायलाहि कोणी तरी हवें होतेंच, म्हणून त्याला एकटेंच घरीं राहावें लागलें.

सूर्य पश्चिमेला कलूं लागला होता. घरासमोरील मोठ्या वृक्षाच्या छायेंत मोहन्या जरा लवंडला होता. स्वतःशींच खेळून खेळून तो कंटाळला होता. त्याचा डोळा लागणार इतक्यांत बंदुकीच्या फाड् फाड् आवाजानें त्याची तंद्री भंग पावली. तो ताडकन् उठून उभा राहिला व आवाजाच्या दिशेनें पाहूं लागला. बंदुकीचे आवाज मधून मधून होतच होते व ते अधिकाधिक जवळ येऊं लागले होते. इतक्यांत गर्द झाडींतून येणाऱ्या जवळच्याच पायवाटेनें एक मनुष्य आपली बंदूक टेकीत टेकीत व लंगडत येतांना त्याला दिसला. त्याचें फाटकें तुटकें मुंडासें अर्धेंअधिक सुटलें होतें, अंगांतील

कपड्यांच्या चिंध्या लोंबत होत्या. त्याचा क्रूर काळाकभिन्न चेहेरा धुळीनें माखलेला होता. त्याच्या मांडींतील जखमेंतून रक्त टिपकत होतें.

वाटमाऱ्यांच्या टोळीचा हा एक नायक होता. रात्रीच्या वेळीं चोरून जवळच्या शिवापुरांत बंदुकीचा दारूगोळा विकत घेण्याकरतां ही स्वारी गेली होती. परततांना पोलिसला पत्ता लागून त्याचा पाठलाग सुरू झाला. त्यांना झुलवीत झुलवीत, लपतछपत तो वाट काढीत होता. पण दुर्दैवानें तो जखमी झाला. लवकर वाट काढतां येईना व त्याचें आश्रयस्थान तर अद्याप दूर होतें. तो मोहन्याजवळ येऊन म्हणाला, " अरे वा ! छोकऱ्या, तूं विक्रमसिंगाचा बच्चा ना रे ? "

मोहन्या उत्तरला " होय, कां बरं ?"

" माझं नांव गंग्या भिल्ल. ऐकलं असशीलच तूं. तुझी आपली जात एक. विक्रमसिंग मला चांगला जाणतो. पोलिस माझ्या पाठलगावर अगदीं नजीक आहे. मला कुठं तरी ताबडतोब लपव पाहूं. मी आतां यापुढ पळण्यांत तग धरूं शकत नाहीं."

" पण बाबा..."

" त्याची नको तुला फिकीर. मी पाहून घेईन."

" पण या गोष्टीला त्यांची परवानगी ? येतीलच ते आतां. जरा थांबा ना, पाणी आणूं प्यायला ? "

" अरे शहाण्या, माझ्या मागावर असलेली पोलिसाची टोळी पांच मिनिटांत इथं येऊन थडकेल. पाहा मी तुझा, तुझ्या या घरचा पाहुणा आहें, तुझ्या गोताचा आहें. विक्रमसिंगाचा बच्चा आहेस तूं ; मला आश्रय न दिलास व मी या तुझ्या उंबरठ्यांत पकडला गेलों तर आपल्या जमातींत त्याची छी थू—"

" बरं, तुला चटकन् लपवलं, तर काय देशील मला ?"

गंग्यानें मुंडाश्याच्या टोंकाला बांधलेला एक रुपया काढला व त्याच्या हातावर ठेवला.

म. ग्रं. सं. ठाणें.




गंजींत चोराला दडविला आहे. मोहन्या हळूच जमादाराला
बोट दाखवीत आहे.

" बस्स, आतां नको फिकिर करूं. " असें म्हणून मोहन्यानें चटकन् जवळच्या गवताच्या लहानशा गंजीवरील कांहीं पेंढ्या बाजूला सारून त्याला गंजींत लपविलें व त्या पेंढ्या पुन्हां नीट रचून ठेवल्या; आणि मोठ्या धूर्ततेनें कुत्र्याचीं तीन लहान पिलें दिलीं ठेवून त्या गंजीवर व पुन्हां पूर्ववत् तो आपल्या जागीं जाऊन शांतपणें पडून राहिला.

थोड्याच अवधींत सहा पोलिस शिपायांची एक टोळी तेथें येऊन थडकली. उंचापुरा ऐटबाज व दाढीकल्ले असलेला त्यांचा जमादार पुढें आला. हाहि पण भिल्लच होता व मोहन्याचा दूरचा काका लागत होता. कट्टू जमादार मोठा तडफदार होता. वाटमाऱ्या भिल्लांच्या टोळ्यांना तर त्यानें चांगलाच वचक बसविला होता. ' कुऱ्हाडीचा दांडा ' होता तो !

" घरीं एकटाच वाटतं मोहन्या तूं ? अन् किती उंचा वाढलास रे पोऱ्या या एकदोन वर्षांत ! बरं, पण का रे, कोणी मनुष्य इकडून जातांना पाहिलास तूं ? "

" वा, वा, काका ! मी कांहीं तुमच्याइतका उंच नाहीं झालों अद्याप !" मोहन्यानें अगदीं सहजीं उत्तर दिलें.

" तें खरं रे, पण सांग ना लवकर, इकडून गेला का इतक्यांत एखादा माणूस ? "

" काय म्हटलंत, एखादा माणूस ? "

" हो रे बुवा ! तांबडं मुंडासं, काळी बंडी अन् अगदीं फाटके तुटके कपडे असलेला एखादा माणुस—"

" हं, हं ! काय म्हणतां तांबडं मुंडासं अन् काळी बंडी नव्हे का–?"

" अरे हो गद्धया, सांग ना कुठं आहे तो माणुस तें !"

" म्हणजे असं पाहा. आज सकाळींच तो आपला धाम्या नाहीं का, तो गेला इकडून त्याच्या तट्टावर बसून. त्याचं मुंडासं होतं बघा तांबडं अन् बंडी—"

" अरे लेका, बनवतोस होय मला ? बऱ्या बोलानं सांग. आतां पांच-दहा मिनिटांपूर्वी एक माणूस गेला कीं नाहीं इकडून ?"

" हं, गेला असेल कीं, मला काय माहीत बुवा ! "

" असं कसं होईल ? तुला माहीत असलंच पाहिजे. " जमादार पाय आपटीत गरजला.

" म्हणजे माणसाला झोपेंत दिसतं वाटतं ! " मोहन्यानें अगदीं साळसूदपणें उत्तर दिलें.

" अरे चोरा, निजला होतास होय तूं ! अन् ते बंदुकीचे धाड् धाड् आवाज नाहीं का शिरले तुझ्या कानांत ?"

" अं ! कसल्या तुमच्या फुसक्या बंदुकी ! माझ्या बाबांची कशी पण ठोठावते धाडकन्."

" मसणांत गेला तुझा—! अन् तूंहि पण. वच्चमजी, तुला माहित असलंच पाहिजे; छे ! तूंच आमची शिकार लपवली असली पाहिजे; तो बिलंदर असा लंगडत लंगडत हा पहाड थोडाच चढून जाणार आहे ! अन् हे रक्ताचे डाग पुढं कुठं दिसत नाहींत. शिरा रे याच्या घरांत अन् करा तलास नीट कानाकोपऱ्यांत ! "

" हं खबरदार ! नीट तोंड संभाळून बोला. अन् घरीं बाबा नाहींत. घरांत शिराल तर याद राखा ! "

कट्टू जमादारानें ताडकन् उडी मारून पोऱ्याचा कान पकडला अन् म्हटलें, " लगावूं कां दहावीस थोबाडांत ? म्हणजे येशील वठणीवर. "

"हं, येईल कदाचित, पण ध्यानांत आहे ना, विक्रमसिंहाचा बच्चा आहें मी ! "

" चूप बे गद्धे ! बेटयाला उचलून नेऊन तुरुंगांत डांबून ठेवीन—माहित नाहीं अजून. अन् उडवीन ढुंगणावर फटके."

मोहन्यानें युक्तीनें चटकन् आपला कान सोडवून घेतला अन् टणकन् चार उडया मारून तो म्हणतो, "लक्षांत ठेवा हं विक्रमसिंग—"

एक शिपाईबुवाहि जमादाराच्या कानाशीं लागले—

" जाऊं द्या कीं–नको याच्याशीं कटकट ! "

मोहन्यानें एक कुत्र्याचें पिल्लूं उचलून घेऊन तो त्याला कुरवाळूं लागला.

घरांतून शोध करून सारे बाहेर आले. भिल्लाचें घर तें काय ! एक केवळ झोपडी व त्यांत सामान म्हणजे थोडीं भांडींकुंडीं, खाट, बाज, अन् कुठें थोडे कपडे, घोंगडया आणि धान्याचीं हंडकींमडकीं; तेथें माणून लपून तरी कसा राहणार ?

मोहन्याचें कुत्र्याला थोपटणें कुरवाळणें चालूच होतें. तो या लोकांची गंमत पाहत होता.

एकजण गंजीजवळ गेला व त्यानें आपली संगीन गंजींत खुपसली पण कांहीं हालचाल नाहीं. तो परत आला. मोहन्याचा चेहरा अगदीं निर्विकार ! पक्का बेरड !

काय करावें हे जमादारबुवांना समजेना. संध्याकाळ होत आलेली. अशा वेळीं समोरच्या अरण्यांत पाऊल टाकण्याचा विचार सुद्धां शक्य नव्हता. अगदीं हातीं आलेली एवढी मोठी शिकार पाहतां पाहतां निसटली याबद्दल त्यांना फारच हळहळ वाटत होती. पण करणार काय ? सर्वच शिपायांचीं तोंडें पाहण्यालायक झालीं. या पोरटयाला धाकधपटशाचा तर कांहींच उपयोग होईना. तेव्हां अगदीं हताश व निराश होऊन पुन्हां शहराच्या वाटेकडे त्यांनीं मोर्चा फिरविला.

जमादाराच्या कोटाच्या आंतल्या खिशांत राजेसाहेबांकडून बक्षिस मिळालेलें चांदीचें एक लहानसें घडयाळ होतें. त्याची सांखळी बाहेर डोकावत होती. त्यांचा हात सहजीं या सांखळीला लागतांच त्यांच्या डोक्यांत एक कल्पना चमकून गेली. दोन हातांवर मोहन्या कुत्र्याच्या पिल्लाशीं खेळत होता. जमादारानें आपला आवाज बनेल तितका सौम्य करून म्हटलें, "मोहन्या, लेका पाहिलस का काय आहे तें हें ! " असें म्हणून त्यानें तें चकचकीत घडयाळ त्याच्या कानाशीं धरलें. तें सुंदर

घड्याळ पाहून मोहन्याचे डोळे विस्फारले. इतकी सुंदर चीज त्या जंगली मुलाला कोठून दिसणार व कशी मिळणार ? शहरांत राजवाड्यांतील एक समारंभ पाहावयास तो एकदां गेला होता. कप्तानसाहेबांच्या मुलाजवळ असेंच एक घड्याळ त्यानें पाहिलें होतें. मधून मधून घड्याळ हातांत घेऊन ते कानाशीं लावीत किती ऐटींत फिरत होता तो !

"पाहिजे तुला हें घड्याळ ? " त्यानें तें मोहनाच्या अगदीं गालाजवळ धरलें. घड्याळाची किट् किट् त्याला ऐकूं येत होती व त्याचा स्पर्श त्याच्या गालाला सुखवीत होता.

" अं, मला घड्याळ ! अं ! ! !"

त्यानें तें अगदीं त्याच्या समोर लोंबकळत धरलें. हेलकाव्याबरोबर सूर्य-प्रकाशांत तें लक्लक् करीत होतें. तो त्याला झोके देत होता.

"हवं ? पाहा तर, कप्तानसाहेबांच्या जवळ अगदीं अस्संच आहे."

मोहन्या आपल्या ओठावरून जीभ फिरवीत घड्याळाकडे खालावून पाहत होता.

"अं, ऽऽ घड्याळ, मला–पण–अं हं–न..."

जमादार खालीं वांकून त्याच्या कानाशीं लागला. त्याच्या हातांतील घड्याळ मोहन्याच्या अगदीं हाताशीं लटकत होतें. मोहन्याची पाठ गंजीकडे होती. त्यानें खांद्यावरून आपला डाव्या हाताचा अंगठा गंजीकडे दाखविला. त्याच्या उजव्या हातांत साखळीसह घड्याळ एकदम पडलें. त्यानें आनंदानें उडी मारली.

शिपायांनीं खुणेसरशीं गंजीला वेढा दिला, भराभर पेंढ्या उपसल्या आणि एका क्षणांत गंग्या भिल्लाला त्यांनीं खालीं ओढून काढलें. जमादारानें चपळाईनें त्याच्या हातांतील खंजीर खसकन् हिसकाऊन घेतला म्हणून बरें, नाहीं तर कोणाची तरी घटका भरली होती.

"चल बे उठ, भला सांपडलास."

"आतां मला उठतां येत नाहीं व चालतांहि पण येत नाहीं." असें म्हणून गंग्या भिल्ल जमिनीवर ऐसपैस उताणा पसरला.

"दहा मिनिटांपूर्वीच हरणासारख्या उड्या मारतां येत होत्या, नाहीं तुला ? चलो, खडा रहो." जमादार पाय आपटीत ओरडला.

"छे, छे, न्यायचंच असेल, तर मला झक्क उचलून न्यावं लागणार तुम्हांला. पाय बिलकुल बेफाम झाला आहे आतां. आपण तर पालखीशिवाय हलणार नाहीं इथून."

"पालखी ! वा रे पालखीवाला. ठीक आहे; बनवा रे एक तिरडी या बद्‌माशाकरतां." जमादारानें हुकूम सोडला.

शिपायांनीं तिथलेच दोन बास, काटक्या, दोऱ्या घेऊन खरीच तिरडी बनविली.

"अरे, गवत घाल कीं निदान पालखीवर. काटक्या बोंचतील ना ?" गंग्या ओरडला.

एका शिपायानें गवताच्या कांहीं पेंढ्या अंथरल्या व मग त्या शय्येवर गंग्याला उचलून ठेविलें.

एखाद्या सुरेखशा पलंगावर, मऊ मऊ गादीवर लोळावें तशा ऐटींत गंग्या अगदीं ऐसपैस पसरला होता.

मोहन्या त्या घडाळाशीं खेळण्यांत अगदीं दंग झाला होता. तो एकदम गंग्याजवळ आला व त्याचा रुपया त्यानें त्याच्या हातावर टाकला.

गंग्यानें विलक्षण क्रोधयुक्त तिरस्कारानें त्याच्याकडे पाहिलें व तो रुपया फाड्‌कन त्याच्या तोंडावर फेकला.

जमादारानें हुकुम दिला, "चलो, उठाव ! अरे, पण याचे हात बांधून टाका पाहूं प्रथम."

एकानें त्याचे दोन्ही हात त्याच्या छातीवर पक्के बांधले व चौघेजण चार टोकाशीं उभे राहून त्याला उचलणार, इतक्यांत दूरच्या वळणावर विक्रमसिंगाची स्वारी घराकडे येत असतांना त्यांना दिसली.

घराजवळ पोलिस ? विक्रमसिंगानें ताबडतोब एक बंदुक हातांत घेतली. बायकोच्या डोक्यावर कसलें तरी पोतें होतें. तें तिला खालीं टाकावयास सांगून तिच्या हातांत दुसरी बंदुक भरून दिली व तो बंदुक रोखून झाडांच्या आड लपत लपत घराच्या रोखानें पुढें पुढें येऊं लागला.

विक्रमसिंगाच्या हातांत रोखलेली बंदुक ! अरे बाप रे ! जमादाराच्या व शिपायांच्या पोटांत धडकीच भरली ! काय करावें ? गोळी सुटण्याचा अवकाश, कीं स्वर्गदार मोकळें, असें प्रत्येकाला वाटूं लागलें.

जमादारानें धाडसाची युक्ति योजली. आपल्या हातांतील बंदुक टाकून देऊन मोकळ्या हातानें तो विक्रमसिंगाच्या रोखानें निघाला, व तो आवाजाच्या टप्प्यांत येतांच मोठ्यानें ओरडून म्हणाला, "रामराम दादा, रामराम, अन् अशी अगदीं बंदुक रोखून कां बुवा ? इतका कां राग आमच्यावर ?"

त्याच्या युक्तीचा योग्य परिणाम झाला. विक्रमसिंगाच्या बंदुकीचा हात ढिलावला. तो पुढें आला व म्हणाला, "रामराम भाऊ, रामराम, गरिबाच्या झोपडीला कशी काय आज आपली भेट ?"

"वा वा ! तें काय विचारतां ? अगदीं शिकार पण शिकार साधली बघा. तो खुनी दरोडेखोर गंग्या भिल्ल..."

"काय, सांपडला कीं काय तो ? फार छान. दोन दिवसांपूर्वीं माझ्या कळपांतल्या दोन छान मेंढ्या लांबवल्या होत्या बेट्यानं."

"सांपडला म्हणजे काय, अगदीं पक्का ! आतां नुकताच एक शिपाई त्यानं ठार केला कीं आमचा, आणि टोळींतले दोघेजण जखमी करून पाडले. आम्ही नऊ जण व तो एकटा; पण अगदीं निसटलाच होता पहा. असा कांहीं बेमालुम लपला होता म्हणतां त्या गंजींत, आम्ही हात हालवीत अगदीं परतलोंच होतों, पण आपला मोहन्या, मोठा हुशार आहे बेटा !"

"मोहन्या ? काय त्याचं ?"

" त्यानंच तर हूं !" असें म्हणून मोहन्यानें आंगठयानें खूण केली होती, तशी त्यानें खूण केली.

" अस्सं काय !" विक्रमसिंह उद्गारला.

" मी कप्तानसाहेबांना सांगून त्याला छान मोठं बक्षीस पाठवीन अन् महाराजांच्याजवळहि अर्थात्च तुमचा व त्याचा उल्लेख करीन."

विक्रमसिंगानें नुसतें हूं सुद्धां म्हटलें नाहीं. त्याचा क्रूर काळा कभिन्न चेहरा जास्त ऊग्र दिसणें शक्यच नव्हतें. पण त्याचे डोळे मात्र खदिरांगारां-सारखे लाल झाले.

यानंतर मुकाट्यानेंच तो झोंपडीजवळ येऊन पोहोचला. विक्रमसिंगाची नजर गंग्या भिल्लाकडे वळली. दृष्टादृष्ट होतांच त्याची क्रूर व तिरस्कारयुक्त नजर पाहून तो चपापलाच !

"बेइमान ! जातभाईशीं बेइमान ! घरच्या पाहुण्याशीं बेइमान ! थुः तुझ्या जिनगानीवर !" असें म्हणून गंग्या झोपडीच्या उंबरठ्यावर थुंकला व त्यानें आपली दृष्टि वळविली.

केवढा भयंकर अपमान ! इतर वेळीं असे उद्गार काढणाऱ्याच्या विक्रमसिंगानें ठिकऱ्याच उडविल्या असत्या; पण या वेळीं त्याचा चेहेरा खर्कन् उतरला व त्यानें आपल्या कपाळावर हात मारून घेतला.

जमादारानें निघण्याची खूण केली. गंग्याची पालखी चालू झाली.

कट्टू जमादारानें विक्रमसिंगाला रामराम केला; पण त्यानें त्याच्याकडे पाहिलेंसुद्धां नाहीं.

पोलिसची टोळी दिसेनाशी झाली.

मोहन्या आपल्या आईकडे एकदां व एकदां बापाकडे पाहत होता. विक्रमसिंगाचे डोळे क्रोधानें लाल भडक झाले होते. त्याचें सर्व शरीर थरथर कांपत होतें.

" फार छान. मोठी छान सुरुवात ! बेइमान ! जातभाईशीं बेइमान-पाव्हण्याशीं बेइमान ! "

" बाबा ! " असें म्हणून मोहन्या बापाच्या पायाजवळ बसला.

" चले जाव ! " विक्रमसिंग गुरगुरला.

मोहन्या थोडया अंतरावर बसून स्फुंदस्फुंदून रडत होता. त्याची आई त्याच्याजवळ गेली. घडयाळाची सांखळी तिला दिसली. तिनें घडयाळ बाहेर काढलें.

" कोणी दिलं तुला हें ?" तिनें रागानें विचारलें.

" काकानं–जमादारसाहेबानं." मोहन्या म्हणाला.

विक्रमसिंगानें तें घडयाळ खसूकन् ओढून घेतलें व जवळच्या खडकावर ताडकन् आपटून त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविल्या व तो ओरडला,

" कोणाचं आहे हें कारटं ? "

मोहन्याची आई एकदम म्हणाली "हं! काय म्हणतां हें ?"

" ठीक, पण आपल्या कुळांत जातीशीं–पाव्हण्याशीं बेइमानी करणारा हा पहिलाच कुलकरंटा !"

मोहन्या मोठमोठयानें स्फुंदून रडत होता. विक्रमसिंगानें दाणकन् बंदुक आदळली व नंतर ती खांद्यावर टाकून तो ओरडला, "चलो निघ, चल माझ्याबरोबर ! "

तो थेट त्या पलीकडील ओघळीकडे निघाला. मोहन्या मुकाटयानें खालीं मान घालून त्याच्यामागून चालूं लागला.

त्याची आई धांवत जाऊन तिनें विक्रमसिंगाच्या पायाशीं लोळण घेतली. " तुमचा बच्चा आहे हो, तो !"

" बाजूला हो मुकाटयानं, चल नीघ घराकडे एकदम ! " विक्रमसिंग कडाडला.

बिचारी मुकाटयानें उठली. तिनें मोहन्याला पोटाशीं धरलें व अश्रूंनीं त्याला न्हाऊं घातलें. विक्रमसिंगाची दृष्टि मागें वळतांच त्याला सोडून ती घरांत शिरली आणि देवीच्या मूर्तीसमोर दंडवत घालून स्फुंदूं लागली—

“ देवा, काय रे हा प्रसंग ! माझा बाळ ! काय होणार आतां त्याचं !” तिनें देवाचा धांवा आरंभला.

बापलेक ओघळीजवळ जाऊन पोहोंचले.

“ त्या खडकाजवळ उभा राहा.”

बिचारें पोर ! तो मुकाट्यानें दाखविलेल्या जागीं उभा राहिला.

“ हं, घे देवाचं नांव !”




**विक्रमसिंग आपल्या मुलाला गोळी घालून ठार करीत आहे.**

“ बाबा ! बाबा ! नका हो, नका हो मारूं मला.”

“ चूप राहा ! देवाचें नांव घे. लवकर आटोप.”

आईनें शिकविलेला देवाचा धांवा मोहन्या पुटपुटला.

“ संपलें ? ” विक्रमसिंगानें विचारलें.

" दया करा बाबा; मी जमादाराला सांगेन कीं गंग्याला सोडून दे. जाऊं बाबा ! आतां जातों धांवत !"

मोहन्या बोलत असतांनाच दुरूनच विक्रमसिंगानें बंदुक रोखली.

"देव तुला क्षमा करो."

मुलानें बापाकडे धांव घेण्याचा प्रयत्न केला; पण—

" धाड् ! "

खालच्या ओघळींत मोहन्या निमिषार्धात विपण्ण होऊन धपकन् आदळला !

विक्रमसिंग घराकडे वळला. त्याला मूठमाती देण्याकरतां कुदळ-पावडें पाहिजे होतें.

बंदुकीचा आवाज ऐकून मोहन्याची आई धांवतच घराबाहेर पडली.

" कुठें आहे हो माझा मोहन्या ! माझा बाळ ? काय केलंत तुम्हीं ?"

" न्याय ! माझ्या कुलांतील न्याय."

" कुठं आहे तो ?"

" त्या ओघळींत. मी त्याला मूठमाती देतों आज. देवाचं नांव घेत असतां त्याला मरण आलं. जा, कोणाला तरी पाठवून वडील जांवयाला आपणाकडे राहायला बोलाव. "

BVBK-0401901
BVBK-0401901

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. क्र. ...९८०१ नों. दि ...........
वि. ...बा.वा. क्र. ...........

## आमचीं प्रकाशनें—

The Crown of wild Olive—Ruskin
Edited by Prof. Y. D. Bhave Rs. 2-0-0
**मुलांसाठीं माडखोलकर** संपादक भा. श्री. परांजपे ,, १-४-०
**चिरंजीव** श्री. रत्नप्रभा घारपुरे, बी. ए., बी. टी. ,, ०-६-०
**तीन सोनेरी केस आणि इतर गोष्टी** कृ. स. केळकर ,, ०-४-०
**उषा** दि. ल. देवधर, एम्. ए. ,, ०-३-०
Everest Primer Meaning Book ,, 0-5-0

## आगामी प्रकाशनें

**भटक्याची कमाई** ( भावरेखा व व्यक्तिरेखा ) उमाकांत भेंडे
**नोलनला देश नाहीं व इतर गोष्टी** कृ. स. केळकर
**मिटुकल्या गोष्टी** प्रो. चिं. वि. जोशी.

## U. B. C. प्रकाशनें—

**Great Biographies Series for Children**
As. 4/- Each

1. Alexander the Great, Julius Caesar, Garibaldi
2. Edison, Madame Curie, Marconi
3. St. Francis of Assisi, Swami Ramkrishna, Swami Vivekananda, Swami Ram Tirtha
4. P. C. Ray, J. C. Bose & C. V. Raman
5. **शाळेसाठीं व इतर गोष्टी** दि. ल. देवधर, एम्. ए. ०-३-०
6. **सुशीलेचा भाऊ व इतर गोष्टी** दि. ल. देवधर, एम्. ए. ०-२-६

**गांवोगांवच्या पुस्तकविक्रेत्यांकडे मिळतील**

**ईस्ट अँड वेस्ट बुक हाउस, बडोदें.**